अहवाल क्रमांक -११५

# पंचायती राज समिती

(२००६-२००७)

(अकरावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या (नांदेड जिल्हा परिषद)
सन १९९९-२००० च्या लेख्यावरील लेखा परीक्षा पुनर्विलोकन तसेच
सन २०००-२००१ च्या वार्षिक प्रशासन अहवालासंबंधीचा

# दहावा अहवाल

(सदर अहवाल दिनांक                एप्रिल, २००७ रोजी विधानसभेस/विधानपरिषदेस
सादर करण्यात आला.)

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई
एप्रिल,२००७.

# पंचायती राज समिती

## (२००६-२००७)

## (अकरावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या(नांदेड जिल्हा परिषद)
सन १९९९-२००० च्या लेख्यावरील लेखा परिक्षा पुनर्विलोकन तसेच सन
२०००-२००१ च्या वार्षिक प्रशासन अहवालासंबंधीचा

# दहावा अहवाल

# पंचायती राज समिती

## ( २००७ -२००८ )

## (दिनांक १४ फेब्रुवारी २००७ पासून)

**समिती प्रमुख**

१) श्री. राजन पाटील, वि.स.स.

**समिती सदस्य**

२) श्री. नाना पंचबुध्दे, वि.स.स.

३) श्री. दिलीप बनसोड, वि.स.स.

४) श्री. रमेशचंद्र बंग, वि.स.स.

५) श्री. माणिक जगताप, वि.स.स.

६) श्री. श्रीनिवास देशमुख (गोरठेकर), वि.स.स.

७) श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

८) ॲड. के.सी. पाडवी, वि.स.स.

९) श्री. सुभाष बने, वि.स.स.

१०) श्री. राजेंद्र मुळक, वि.स.स.

११) श्री. विरेंद्र जगताप, वि.स.स.

१२) श्री. सुनिल केदार, वि.स.स.

१३) श्रीमती मनिषा निमकर, वि.स.स.

१४) श्री. कैलास पाटील, वि.स.स.

१५) श्री. विश्वास नांदेकर, वि.स.स.

१६) श्री. संजय राठोड, वि.स.स.

१७) श्री. अतुल देशकर, वि.स.स.

१८) श्री. उत्तम इंगळे, वि.स.स.

१९) श्री. साहेबराव घोडे, वि.स.स.

२०) श्री. सदाशिव लोखंडे, वि.स.स.

२१) श्री. शरद रणपिसे, वि.प.स.

२२) श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.

२३) श्री. शिवाजीराव पाटील, वि.प.स.

२४) श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

२५) श्री. रामनाथ मोते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री.अनंत कळसे, प्रधान सचिव
श्री.वि.वा.देशमुख, उप सचिव
श्री.रा.रा. काठे, समिती अधिकारी
श्री.शा.पां. कांबळे, कक्ष अधिकारी
श्री.एस.बी.गायकवाड, कक्ष अधिकारी

## पंचायती राज समिती
## (२००५-२००६)

**समिती प्रमुख**

१) श्री. रमेशचंद्र बंग, वि.स.स

**समिती सदस्य**

२) श्री. शशिकांत शिंदे, वि.स.स

३) श्री. दिलीप बनसोड, वि.स.स.

४) श्री. किसन कथोरे, वि.स.स.

५) श्री. माणिकराव जगताप, वि.स.स.

६) श्री.श्रीनिवास देशमुख (गोरठेकर),वि.स.स.

७) श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

८) श्री. भाऊराव पाटील, वि.स.स.

९) श्री. हफिज धत्तुरे, वि.स.स.

१०) श्री. राजेंद्र मुळक, वि.स.स.

११) ॲड. के.सी.पाडवी,वि.स.स.

१२) श्री. सुनिल केदार, वि.स.स.

१३) श्री. संजय राठोड, वि.स.स.

१४) रिक्त

१५) श्रीमती मनिषा निमकर, वि.स.स.

१६) श्री. विश्वास नांदेकर , वि.स.स.

१७) श्री.दिंगबर भेगडे, वि.स.स.

१८) ॲड.विजय जाधव.वि.स.स.

१९) श्री. चंद्रशेखर बावनकुळे,वि.स.स.

२०) श्री.टी.पी.कांबळे, वि.स.स.

२१) श्री. महादेवराव महाडिक,वि.प.स.

२२) श्री.प्रतापसिंह मोहिते-पाटील,वि.प.स.

२३) श्री.शिवाजीराव पाटील, वि.प.स.

२४) रिक्त

२५) श्री.दिवाकर रावते,वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

१. श्री. विलास पाटील, प्रधान सचिव (१)

२. श्री. अनंत कळसे, प्रधान सचिव (२)

३. श्री. भा.ना. कांबळे, उप सचिव

४. श्री. रा.रा. काठे, समिती अधिकारी

५. श्री. शा.पां.कांबळे, कक्ष अधिकारी

६. श्री. एस.बी. गायकवाड, कक्ष अधिकारी

***** सन्माननीय सदस्य श्री. विजय वडेट्टीवार यांनी दिनांक २१ जुलै, २००६ रोजी आपल्या सदस्यत्वाचा राजीनामा दिल्याने पद रिक्त.

****** सन्माननीय सदस्या श्रीमती कांता नलावडे, यांची दिनांक २७ जुलै, २००६ रोजी सदस्यत्वाची मुदत संपल्यामुळे पद रिक्त.

## प्रस्तावना

मी, पंचायती राज समितीचा समिती प्रमुख या नात्याने समितीने अधिकार दिल्यावरुन पंचायती राज समितीचा दहावा अहवाल सादर करीत आहे.

सन २००७-२००८ करिता समिती दिनांक १४ फेब्रुवारी २००७ रोजी गठित झाली. महाराष्ट्र विधानसभा नियमावलीतील नियम २४० अन्वये विधानमंडळाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या जिल्हा परिषदांच्या वार्षिक प्रशासन अहवालाची तसेच महाराष्ट्रातील पंचायती राज संस्थांच्या लेख्यांवरील लेखापरिक्षा पुनर्विलोकन अहवाल व एकत्रित वित्तीय व महसूली लेखे यांच्या परीक्षणाची कामे प्रामुख्याने या समितीकडे सोपविण्यात आलेली आहेत.

सन २००५-२००६ करिता गठित झालेल्या समितीने सन १९९९-२००० च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन तसेच सन २०००-२००१ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात नांदेड या जिल्हा परिषदेची सखोल तपासणी केली. समितीने नांदेड जिल्हा परिषदेस दिनांक ९,१० व ११ नोव्हेंबर,२००५ रोजी भेटी देऊन त्यावेळी श्री. जी.बी.मवारे, मुख्य कार्यकारी अधिकारी, नांदेड जिल्हा परिषद व श्री. आर.डी. कुलकर्णी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी नांदेड जिल्हा परिषद यांची साक्ष घेतली.

सन २००५-२००६ च्या समितीने नांदेड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या तसेच साक्षीचे वेळी संबंधीत अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीच्या आधारे उपस्थित झालेल्या मुद्दयांबाबत अधिक माहिती घेण्याच्या दृष्टीने दिनांक २७ व २८ जून, २००६ तसेच १ ऑगस्ट , २००६ रोजी संबंधीत मंत्रालयीन विभागाच्या सचिवांच्या / प्रतिनिधींच्या साक्षी घेतल्या.

मंत्रालयीन विभागीय सचिवांचे साक्षीचे वेळी श्री. जयराज फाटक, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, श्रीमती कविता गुप्ता, सचिव, वित्त विभाग, श्री. एस.एस. हुसेन, प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, श्री. पी.पी. श्रीवास्तव, प्रधान सचिव, ग्रह विभाग, श्री. बलदेवचंद, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, श्री.व्ही.व्ही. बोरगे, सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग श्री. एस.एन.हुद्दार, सचिव, जलसंपदा लाभक्षेत्र विकास, श्री. मुकेश खुल्लर, सचिव, कृषी, श्री. अे.डी. ठाकरे, कृषी संचालक, श्री. पी.वी. जाधव, सचिव व विधी सल्लागार, श्री. डी.के. शिवाजी, विकास आयुक्त (उद्योग), श्री. सतिश गवई,

सह व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघुउद्योग विकास महामंडळ, श्री. जयंत कावळे, सचिव, सहकार विभाग यांनी समितीला तिच्या कामकाजात केलेल्या सहकार्याबाबत समिती त्यांची आभारी आहे.

समितीने आपल्या बैठकीमध्ये केलेल्या कामकाजाचा संक्षिप्त वृत्तांत अहवालाच्या शेवटी "परिशिष्ट" म्हणून जोडण्यात आला आहे.

लेखा व प्रशासन अहवालांच्या संदर्भात समितीने भेट दिलेल्या नांदेड जिल्हा परिषदेच्या कामकाजाची तपासणी करीत असताना समितीला आढळून आलेल्या काही मुद्दयांबाबत समितीचे अभिप्राय या अहवालात दिले आहेत.

समितीचा कार्यकाळ संपल्यामुळे सदर समितीचा अहवाल त्यावेळच्या समितीला विचारात घेऊन संमत करता आला नाही.

नव्याने गठीत झालेल्या समितीने दिनांक        एप्रिल, २००७ रोजी अहवाल विचारात घेऊन संमत केला.

| | |
|---|---|
| **विधान भवन** | **राजन पाटील,** |
| मुंबई | समिती प्रमुख, |
| दिनांक :      एप्रिल,२००७. | पंचायती राज समिती |

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | प्रकरण क्रमांक | विषय | परिच्छेद क्रमांक | पृष्ठ क्रमांक |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| | | **प्रकरण एक**<br>**नांदेड जिल्हा परिषद (लेखा)** | | |
| १. | १.१ | ग्रामीण शौचालय कार्यक्रमाअंतर्गत शौचालय बांधकाम | ३-३० | |
| २. | १.२ | ब्लिचिंग पावडर विरंजक चूर्ण खरेदीतील अनियमितता. | ३-१७७ | |
| ३. | १.३ | औषधी खरेदीबाबत | ३-२४२ | |
| | | **प्रकरण दोन**<br>**नांदेड जिल्हा परिषद (प्रशासन)** | | |
| ४. | २.१ | जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त असल्याबाबत. | | |

## प्रकरण - एक

## नांदेड जिल्हा परिषद (लेखा)

### १.१ ग्रामीण शौचालय कार्यक्रमाअंतर्गत शौचालय बांधकाम

**लेखा परिच्छेद क्र.३.३०**

सन १९९९-२००० च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेद क्रमांक ३.३० मध्ये मुख्य लेखा परिक्षकांनी खालील प्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

१. शासन निर्णय-पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. १०९८/प्र.क्रमांक ६७/पापु-१६, दि. १ डिसेंबर, १९९८ मधील सुचनांनुसार लाभार्थीची निवड ग्रामपंचायतीने करावयाची असून सदर यादीस गट विकास अधिकाऱ्यांमार्फत जिल्हा परिषदेची मान्यता घेणे आवश्यक आहे. तथापि तशी कार्यवाही का करण्यात आली नाही, याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

२. लाभार्थी हिस्सा रोख स्वरुपात घेतला किंवा कसे, याची खात्री करता आली नाही.

३. जिल्हा परिषदेने स्वतःचा हिस्सा स्वउत्पन्नातून द्यावयाचा असताना आयोगाकडून प्राप्त अनुदानातून का देण्यात आला, याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

४. ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमांतर्गत सेवाभावी संस्थांना अग्रिम मंजूर करण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना आहेत. तथापि तशी मंजुरी न घेताच अग्रिम देण्यात आले याचा खुलासा होणे आवश्यक आहे.

५. पूर्णत्वाच्या प्रमाणपत्रामध्ये "योजनेच्या मार्गदर्शक सुचनानुसार किंवा मापदंडाप्रमाणे काम केले आहे", असा उल्लेख नाही. तसेच सदर दाखले ग्रामसेवकाने गट विकास अधिकारी यांना दिले आहेत त्यामुळे शौचालयाचे काम विहीत मापदंडाप्रमाणे असल्याबाबत व दर्जाबाबत खात्री करता आली नाही.

६. शासन निर्देशानुसार पूर्ण झालेल्या शौचालयांचे उप मुख्य कार्यकारी अधिकारी, गट विकास अधिकारी यांचे पाहणी अहवाल लेखापरिक्षणास पडताळणीसाठी उपलब्ध केले बांधकामाबाबत खात्री करता आली नाही.

जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून लेखी स्वरुपात खालीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे:-

१. शासनाच्या सुचनांनुसार लाभार्थींची निवड ग्रामपंचायतीने केलेली असून यादी गट विकास अधिकाऱ्यांना देण्यात आलेली आहे व पंचायत समिती स्तरावर लाभार्थी यादी उपलब्ध आहे.
२. शासन निर्णय-पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. १०९८/प्र.क्रमांक ६७/पापु-१६, दि. १ डिसेंबर, १९९८ मधील सुचनेप्रमाणे लाभार्थी हिस्सा हा रु. ५००/- रोख स्वरुपात किंवा साहित्य वा श्रमाच्या रुपाने अदा करावयाचा आहे. त्याप्रमाणे लाभार्थींनी श्रमाच्या स्वरुपात आपला हिस्सा नोंदविलेला आहे त्यामुळे तो रोख स्वरुपात घेतलेला नाही.
३. सन १९९९-२००० या वित्तीय वर्षात जिल्हा परिषदेने स्वतःच्या उत्पन्नातून शौचालय बांधकामासाठी पंचायत समिती, नांदेडला रु. २२,०००/- अनुदान प्राप्त करुन दिलेले होते यातून कमी लाभार्थींना लाभ मिळाला असता म्हणून शासनाकडून याच कामासाठी रु. ५०० प्रति शौचालयाप्रमाणे दहाव्या वित्त आयोगातून अनुदान उपलब्ध करुन देण्यात आल्यामुळे देण्यात आलेले आहे.
४. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे संस्था निहाय दिलेल्या आदेशामध्ये ज्या नियम व अटी दिलेल्या होत्या, त्यामध्ये अ.क्र. १२ मध्ये गट विकास अधिकारी यांनी संस्थांना कामे सोपवित असताना रु. १०००/- प्रति शौचालयाप्रमाणे अग्रिम संस्थांना अदा करावा असे नमूद केलेले असल्यामुळे त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे.
५. शासन परिपत्रक क्र. आरएसपी/१०१६/प्र.क्र.१५९/पापु-१६/दि. २९ मे, १९९७ नुसार ग्रामसेवकानेच शौचालय कामाची पाहणी करुन पूर्णत्वाचा दाखला गट विकास अधिकारी यांना द्यावयाचा आहे व या परिपत्रकासोबत पूर्णत्वाचा दाखला देणे संबंधी जे प्रपत्र देण्यात आले होते, त्यामध्ये कोठेही योजनेच्या मार्गदर्शक सुचनांनुसार किंवा मापदंडाप्रमाणे काम केले आहे असा उल्लेख केलेला नसल्यामुळे जे प्रपत्र दिलेले होते, त्याच प्रपत्रात ग्रामसेवकाने पूर्णत्वाचा दाखला दिलेला आहे.

६. उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पं) व गट विकास अधिकारी यांनी ग्रामपंचायत भेटीच्या वेळी व दौऱ्यामध्ये शौचालय बांधकामाची पाहणी केलेली आहे. परंतु तपासणीचे फॉर्म भरुन कार्यालयामध्ये दाखल न केल्यामुळे तपासणी फॉर्म लेखा परिक्षणाच्या वेळेस दाखविण्यात आलेले नाहीत, परंतु दौरा दैनंदिनी मध्ये शौचालयाची पाहणी केली आहे असे आढळून येते.

**मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची साक्ष :**

सन १९९९-२००० च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालातील परिच्छेद क्रमांक ३.३० ग्रामीण शौचालय बांधकामाअंतर्गत शौचालय बांधकाम या संदर्भात दिनांक ९ नोव्हेंबर, २००५ रोजी समितीने नांदेड जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, ग्रामीण शौचालय बांधकाम या योजने अंतर्गत गट विकास अधिकाऱ्यांमार्फत जिल्हा परिषदेस प्राप्त झालेल्या लाभार्थींच्या यादीप्रमाणे अनुदान वितरित करण्यात आले होते का, तसेच, लाभार्थी हिस्सा श्रमाच्या रुपाने घेतल्याबाबतचे अभिलेख लेखा परीक्षणाच्या वेळी दाखविण्यात आले होते का, त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर प्रश्नाचे उत्तर होय असे दिले. समितीने पुढे अशीही पृच्छा केली की, लाभार्थींची यादी गटविकास अधिकारी यांच्यामार्फत तयार करण्यात आली आहे. पंचायत समिती निहाय यादी आम्हाला मिळाली की, आम्ही उद्या भेटीच्या वेळी ती टॅली करुन पाहू. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर कामासंबंधीची यादी मी आज सायंकाळ पर्यंत समितीला वितरित करतो असे सांगितले याबाबत समितीने लाभार्थींच्या हिश्श्याचे स्वरुप कशाप्रकारे ठरविले आहे, त्यावर मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी असा खुलासा केला की, पाणी पुरवठा विभागाचा १ डिसेंबर, १९९८ रोजीचा जी.आर. आहे. त्या जी.आर. नुसार लाभार्थींची निवड ग्रामपंचायतीने केली आहे. या संदर्भात समितीने अशी विचारणा केली की, लाभार्थींना श्रमाच्या स्वरुपात हिस्सा दिलेला आहे. त्यांच्या श्रमाचे मुल्यमापन आपण कसे केले आहे, त्याचे निकष काय आहेत, त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असा खुलासा केला की, शौचालयाच्या बांधकामासाठी लागणाऱ्या मजुरीचे काम लाभार्थींनी केले आहे. त्याप्रमाणे त्यांना त्यांच्या श्रमाचा हिस्सा देण्यात आला आहे. चार हजार रुपयाचे काम केले म्हणजे मुल्यमापन

झालेले आहे.  त्यावर समितीने अशी पृच्छा केली की, रुपये ५००/- चे काम झाले हे आपण

कसे काय ठरविले, मोजमाप पुस्तकातील रेकॉर्डवरुन मुल्यमापन केले आहे का, त्यावर अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी शौचालयाच्या कामावरुन मुल्यमापन केले आहे असा खुलासा केला असता समितीने अशी विचारणा केली की, श्रमाच्या मोबदल्याचे मुल्यमापन एम.बी. रेकॉर्डवर आहे काय, त्यावर अतिरिक्त अधिकाऱ्यांनी असे सांगितले की, श्रमाच्या मोबदल्याचे मूल्यामापन एम.बी. रेकॉर्डवर नाही. परंतु, लाभार्थींना हिस्सा दिला आहे हे रेकॉर्डवर आहे. जवळ जवळ १५४०० शौचालये बांधण्यात आली आहेत.

या संदर्भात समितीने अशी पृच्छा केली की, आपण जे मुल्यामापन केले आहे. ते दुपार पर्यंत समितीला दाखववावे. शौचालय बांधकामासाठी स्वतःचा हिस्सा देण्याकरिता पुरेसे अनुदान जिल्हा परिषदेकडे उपलब्ध नसल्याने १० व्या वित्त आयोगांतर्गत प्राप्त होणाऱ्या अनुदानामधून स्वहिस्सा देण्यास शासनाने मंजूरी दिली होती त्यावर अतिरिक्त मुख्य  कार्यकारी अधिकारी यांनी असा खुलासा केला की, दिनांक १८ डिसेंबर, २००० रोजीच्या शासन पत्रान्वये आम्हाला परवानगी मिळाली आहे. समितीने पुढे अशीही विचारणा केली की, ग्रामीण शौचालयासाठी परवानगी दिलेली आहे. वैयक्तिक शौचालयाच्या बांधकामासाठी परवानगी देता येत नाही. आपण वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी परवानगी दिली आहे. तसेच दहाव्या वित्त आयोगाचे पैसे कसे वापरावयाचे आहेत याचा अर्थ जिल्हा परिषदेने सोयीस्करपणे लावलेला आहे. वैयक्तिक शौचालयाच्या बांधकामासाठी दहाव्या वित्त आयोगाचे पैसे वापरता येतात का, याचा खुलासा मुख्य वित्त व लेखा अधिकारी यांनी करावा, त्यावर मुख्य लेखा वा वित्त अधिकारी यांनी असा खुलासा केला की, ग्रामीण शौचालय बांधकामासंबंधीत शासनाने परिपत्रक काढलेले आहे. जिल्हा परिषदेने ज्या ज्या ठिकाणी या योजनेतून कामे हाती घेतली असतील, त्यांनी स्वनिधीतून सापेक्ष सहभाग घ्यावा असे परिपत्रकात म्हटले आहे. समितीने असे सूचित केले की, ग्रामीण शौचालये बांधकामाकरिता दहाव्या वित्त आयोगाचे पैसे वापरता येत नाहीत. त्यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी असे विदीत केले की, जिल्हा परिषदेने सदर कामे करण्यासंदर्भात स्वनिधीतून सहभाग घ्यावा अशा प्रकारचे शासनाने परिपत्रक काढलेले आहे.

जिल्हा परिषदेकडे स्वतःचा सोर्स कमी असतो, त्यामुळे दहाव्या वित्त आयोगाचा पैसा ग्रामीण शौचालये बांधकामासाठी वापरण्यात आलेला आहे. त्या कालावधीत जिल्हा परिषदेची आर्थिक परिस्थिती अडचणीची होती म्हणून दहाव्या वित्त आयोगाचा पैसा वापरलेला आहे. याबाबत समितीने अशी विचारणा केली की, आपण दहाव्या वित्त आयोगाचा पैसा ग्रामीण शौचालये बांधकामासाठी खर्च केला आहे, त्यास शासनाची परवानगी घेतली होती काय, त्यावर मुख्यलेखा व वित्त अधिकारी यांनी असे उत्तर दिले की, यासंदर्भात शासनाची परवानगी घेतलेली नाही. यावर समितीने अशी पृच्छा केली की, ग्रामीण शौचालयाचे बांधकाम करण्यासाठी दहाव्या वित्त आयोगाचा पैसा खर्च केला परंतु त्यास शासनाची परवानगी घेतली नाही. गट विकास अधिकारी यांना प्रति शौचालयाच्या बांधकामासाठी ५० रुपये अग्रीम देण्याचा अधिकार असताना १ हजार रुपयांचा अग्रीम संस्थांना दिलेला आहे. परंतु शौचालयाच्या बांधकामासाठी १ हजार रुपये अग्रीम गट विकास अधिकाऱ्यांनी कशाच्या आधारावर दिला, याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिनांक २० फेब्रुवारी, ९९ संस्थानिहाय रोजी आदेश दिले होते त्यात असे म्हटले होते की, केंद्र सरकार आणि राज्य सरकार पुरस्कृत ग्रामीण स्वच्छता योजनेअंतर्गत वैयक्तिक शौचालय बांधकाम करण्यासाठीचा जिल्हा परिषदेचा हिस्सा दहाव्या वित्त आयोगाच्या निधीतून गटविकास अधिकारी यांच्याकडे सुपूर्द करण्यात येत आहे. यासंदर्भात २२ हजार ६१४ चे उद्दिष्ट देण्यात आले होते व त्यासाठी १ कोटी १३ लाख ७०० रुपये निधीची गरज होती. आदेशाप्रमाणे सदर बांधकामासाठी दहाव्या वित्त आयोगाच्या निधीतून रुपये ५३,०५,०३१/- एवढी रक्कम तालुक्यातील सर्व गटविकास अधिकाऱ्यांकडे सुपूर्द केलेली आहे. समितीने पुढे अशी पृच्छा केली की, गटविकास अधिकारी यांना ग्रामीण शौचालये बांधकामासाठी संस्थांना प्रति शौचालय ५०० रुपये देण्याचा अधिकार असताना संबंधित गटविकास अधिकाऱ्यांनी प्रति शौचालय एक हजार रुपये अग्रीम दिलेला आहे. गटविकास अधिकाऱ्यांनी एक हजार रुपये अग्रीमाची रक्कम दिली आहे. त्यास पंचायत समितीच्या सभेची मंजुरी घेतली होती काय, त्यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी पंचायत समितीच्या सभेची मंजुरी घेतलेली नाही. असे सांगितले त्यावर समितीने पंचायत समितीच्या सभेत डेप्युटी अकाऊन्टंट यांनी हा विषय मंजुरीसाठी का ठेवला नाही, नियम २०१

प्रमाणे या विषयास पंचायत समितीच्या सभेची मान्यता घेण्याची आवश्यकता होती किंवा नाही, अशी विचारणा केली असता नियम २०१ प्रमाणे पंचायत समितीच्या सभेची मान्यता घ्यावयास पाहिजे होती असे विदीत केले याबाबत समितीने पंचायत समितीच्या डेप्युटी अकाऊन्टंट यांनी नियमाचे पालन केले नाही. यासंदर्भात अनियमितता झालेली आहे याकडे मुख्य लेखा व वित्त

अधिकारी यांनी कधी पाहिलेले दिसत नाही. अशा प्रकारच्या अनियमिततेकडे मुख्य लेखा व वित्त अधिकाऱ्यांची पाहणी करण्याची जबाबदारी नाही काय, तसेच पंचायत समितीच्या अकाऊन्टंट यांना नियम २०१ माहिती आहे काय, डेप्युटी अकाऊन्टंट यांच्याकडून नियम २०१ चे सरळ सरळ उल्लंघन केले गेले आहे. हा प्रश्न किती तालुक्यातील आहे, अशी विचारणा केली असता नऊ तालुक्यांचा हा प्रश्न आहे असे मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी सांगितले.

या नऊ तालुक्यांच्या पंचायती समितीच्या तत्कालीन डेप्युटी अकाऊन्टंट यांनी नियम २०१ चे उल्लंघन केले असल्यामुळे या सर्व नऊ तत्कालीन डेप्युटी अकाऊन्टंट याची एक वेतनवाढ रोखण्यात यावी. सदर नऊ तालुके कोणकोणते आहेत, याची माहिती समितीला सांगावी, असे सुचित केले असता मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी असा खुलासा केला की, भोकर, बिलोली, देगलूर, हदगाव, किनवट, कंधार, लोहा, मुखेड, नांदेड अशा नऊ तालुक्यातील हा प्रश्न आहे. समितीने पुढे अशी पृच्छा केली की, पूर्ण झालेल्या शौचालय बांधकामाच्या पाहणीसाठी केलेल्या दौऱ्यांनतर बांधकामाबाबत लिखीत अहवाल सादर करणे आवश्यक नव्हते काय, त्यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी असे सांगितले की, संबंधित अधिकाऱ्यांनी तशा प्रकारचा लिखीत अहवाल सादर करणे आवश्यक होते. संबंधित अधिकाऱ्यांनी या कामासंबंधीचा लिखित अहवाल सादर केलेला नाही. त्यावर या संदर्भात कोण अधिकारी जबाबदार आहेत, अशी समितीने विचारणा केली असता मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी अशी माहिती दिली की, कनिष्ठ अभियंता यांनी ३ टक्के उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं) यानी ५ टक्के आणि गटविकास अधिकारी यांनी १० टक्के शौचालयाच्या बांधकामाच्या पाहणीसाठी केलेल्या दौऱ्यानंतर बांधकामाबाबतचा लिखीत अहवाल सादर केला पाहिजे. परंतु टक्केवारीप्रमाणे संबंधित अधिकाऱ्यांकडून शौचालयाच्या बांधकामांची पाहणी केली गेलेली दिसत नाही. या संदर्भात समितीने पृच्छा केली की, जर संबंधित अधिकाऱ्यांनी

तपासणी केली नसेल तर ती कामे झाली आहेत याचा पुरावा काय आहे, त्यावर उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, शौचालयाच्या बांधकामाची पाहणी करणे आवश्यक होते. त्या कामाना भेटी देऊन त्यासंबंधीचा लिखित अहवाल सादर करणे देखील आवश्यक होते. समितीने पुढे अशी विचारणा केली की, कनिष्ठ अभियंता यांनी ३ टक्के

उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांनी ५ टक्के आणि गटविकास अधिकारी यांनी १० टक्के शौचालयाच्या बांधकामांची तपासणी करावी व बांधकामासंबंधीचा लिखीत अहवाल सादर करावा अशा प्रकारचे परिपत्रक शासनाने काढलेले आहे. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे नमूद केले की, संबंधित अधिकाऱ्यांनी शौचालये बांधकामाची तपासणी करावी अशा प्रकारचे जिल्हा परिषदेने देखील परिपत्रक काढलेले आहे. त्याबाबत समितीने असे निदेश दिले की, संबंधित अधिकाऱ्यांनी शौचालयाच्या बांधकामांची तपासणी केलेली नसल्यामुळे त्यांच्या दौऱ्याच्या नोंदवह्या नामंजूर कराव्यात व त्यासंबंधीचा अहवाल समितीला एका महिन्यात सादर करावा.

**सचिवांची साक्ष :-**

समितीला प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे अधिक माहितीसाठी समितीने दिनांक २७ जून, २००६ रोजी विभागीय सचिवांची साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी दहाव्या वित्त आयोगांतर्गत ग्रामीण शौचालय बांधकामासाठी खर्च केलेल्या रकमेस जिल्हा परिषदेने ग्रामविकास विभागाची परवानगी घेतली आहे काय व असल्यास, केव्हा ? नसल्यास परवानगी न घेता खर्च केलेल्या रकमेबाबत शासनाने जिल्हा परिषदेकडे विचारणा केली आहे काय, असल्यास केव्हा, तसेच ही बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे काय, असल्यास, ग्रामीण शौचालय बांधकामासाठी विनापरवानगीने किती रक्कम जिल्हा परिषदेने खर्च केली आहे, अशी विचारणा केली असता, प्रधान सचिव, ग्रामविकास यांनी खुलासा केला की, ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमासाठी दिलेल्या निधीमधून, जिल्हा परिषद उत्पन्नाचा भाग म्हणून दहाव्या वित्त आयोगाच्या अंतर्गत ग्रामीण स्वच्छता कार्यक्रम राबवावा अशा सूचना दिलेल्या होत्या. त्याप्रमाणे जिल्हा परिषदेने ग्रामीण शौचालये बांधलेली होती. त्यामध्ये ५ टक्के शौचालयांचे मुल्यांकन कनिष्ठ अभियंता यांनी करावे, गट विकास अधिकारी यांनी पंचायत समिती हद्दीतील १० टक्के शौचालयांची पाहणी

करावी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) यांनी ३ टक्के शौचालयांची तपासणी करावी अशा सूचना देण्यात आलेल्या आहेत. पण बांधकाम तपासणीबद्दल लेखी रिपोर्ट त्यांच्याकडून मागवत नव्हतो. सन १९९९-२००० मध्ये दहाव्या वित्त आयोगाच्या अंतर्गत ७६ लाख ५६ हजार रुपये एवढा निधी मिळाला होता. त्यापैकी ६१ लाख रुपये पहिल्या वर्षी खर्च केले आणि १५ लाख रुपये दुसऱ्या वर्षी खर्च केले. त्यामध्ये १५,४०० शौचालये बांधली. कनिष्ठ अभियंता, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, गट विकास अधिकारी यांनी शौचालयांची पाहणी केली आहे. त्यांच्या दौरा दैनंदिनीमध्ये पाहणी केल्याची नोंद आहे.

समितीने पुढे अशीही विचारणा केली की, १० व्या वित्त आयोगाच्या निधीतून शौचालये बांधण्यासाठी जिल्हा परिषदेने ग्रामविकास विभागाची परवानगी घेतली होती काय, यासंदर्भातील शासन निर्णय दाखविण्यात यावा. त्यावर सचिवांनी अशी माहिती दिली की, शौचालयाच्या बांधकामाची तपासणी गट विकास अधिकारी यांच्यामार्फत करण्यात येते. १०व्या वित्त आयोगाचा निधी प्रामुख्याने ग्रामीण स्वच्छतेसाठी ४० टक्के खर्च करावयाचा आहे. तसेच प्राथमिक शाळांसाठी २१ टक्के निधी, इमारत दुरुस्तीसाठी १४ टक्के निधी अशा प्रकारे एकूण ४० टक्के निधी ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमासाठी खर्च करावयाचा आहे. त्याप्रमाणे सबंधित अधिकाऱ्यांनी तपासणी केल्याचे दिसून येत आहे. या संदर्भात समितीने किती टक्के कामाची तपासणी करण्यात आलेली आहे, अशी पृच्छा केली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, अधिकाऱ्यांच्या दौरा नोंदवहीवरुन तपासणी केल्याचे दिसून येते. त्यावर समितीने तपासणी अधिकाऱ्यांनी शेरे बुकात नोंद केलेली आहे काय, शेरे बुकात नोंद केल्याशिवाय त्यांची दौरा नोंदवही ग्राहय धरता येत नाही असे समितीने मत व्यक्त केले. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी असे नमूद केले की, संबंधित अधिकाऱ्यांनी जे लिहिले आहे, ते खरे असे आम्ही समजतो. तसेच प्रधान सचिवांनी अधिक खुलासा करावा जे अधिकारी ग्रामपंचायतीला भेट देतात त्यातील काही अधिकारी शेरे बुकात नोंद करतात तर काही अधिकारी नोंद करीत नाहीत असे नमूद केले. समितीने पुढे अशीही सूचना केली की, यासंदर्भात आपणाला धोरणात्मक निर्णय घ्यावा लागणार आहे, ५ ते १० टक्के फक्त तपासणी करण्यात येते, तसेच सदर अधिकारी त्यांच्या कार्यालयातील मुव्हमेंट रजिस्टरवर नोंद करतात काय, त्यावर प्रधान सचिवांनी सदर ठिकाणी सर्व कामे पूर्ण झालेली आहेत, तेथे कोणतीही

तक्रार आलेली नाही असा खुलासा केला. यासंदर्भात आपल्या विभागाने जे परिपत्रक काढलेले आहे, त्याचा अर्थ काय होतो, असे समितीने विचारले असता प्रधान सचिवांनी खुलासा केला की, तपासणी करणे अभिप्रेत आहे. अधिकारी तपासणी करतांना त्यांच्या दौरा नोंदवहीमध्ये नोंदी करतात. ग्रामपंचायतीच्या शेरे बुकात काही अधिकारी नोंदी करतात. काही अधिकारी नोंदी करीत नाहीत, काही ठिकाणी साईटवर जाऊन पाहणी करण्यात येते. त्यानंतर ते लगेच पुढील कामासाठी तेथूनच निघून जातात. ग्रामपंचायतीच्या पुस्तकात नोंदी घ्याव्यात असे बंधनकारक नाही. याबाबत समितीने विचारणा केली की, वर्ग १ च्या अधिकाऱ्यांनी ग्रामपंचायतीच्या शेरे बुकात नोंद केलीच पाहिजे असे बंधन नाही हे आपले म्हणणे समिती मान्य करते परंतु सदर कामाचा पाहणी करण्यामागील उद्देश काय आहे, सदर काम क्वॉलिटीप्रमाणे झालेले आहे किंवा नाही याबाबतची नोंद कोठे तरी होणे आवश्यक आहे, त्यावर प्रधान सचिवांनी असे विदीत केले की, बऱ्याच वेळा बैठकीमध्ये तोंडी आढावा घेण्यात येतो, अमुक अमुक विकास कामे किती झाली, आता कामाची सद्यस्थिती काय आहे, जेथे आवश्यकता आहे तेथे रिपोर्ट लिहिण्यात येतो यासंदर्भात समितीने अशी सूचना केली की, आपण जे परिपत्रक काढलेले आहे त्याची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. परिपत्रकांची अंमलबजावणी जर करण्यात येत नसेल तर त्या परिपत्रकांचे उल्लंघन होत आहे. यामध्ये आपण किती अधिकाऱ्यांना वाचविण्याचे काम करणार आहात, त्यावर प्रधान सचिवांनी असे सांगितले की, ज्या ठिकाणी कामे झालेली आहेत, तेथील तपशील मिळालेले आहेत अशा ठिकाणी अविश्वास दाखविणे योग्य होणार नाही. समितीने असे मत व्यक्त केले की,परिपत्रकांचे ज्यांच्याकडून उल्लंधन होईल, त्यांच्यावर कारवाई व्हावी असे मला वाटते. त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सदर ठिकाणी १६३३९ शौचालये बांधण्याची कामे हाती घेण्यात आली होती. त्यातील १५४०५ शौचालये बांधून पूर्ण झालेली आहेत. उर्वरित कामे पूर्ण करण्यात येत आहेत असे नमूद केले. समितीने पुढे अशी विचारणा केली की, शौचालये बांधकामासाठी संपूर्ण पैसा देण्यात आलेला आहे काय, त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी १६३३९ शौचालये बांधण्यासाठी ७६ लाख रुपये देण्यात आले होते. त्यातील ६१ लाख रुपये खर्च करुन १५५०५ शौचालये बांधून पूर्ण झालेली आहेत, १५ लाख रुपये जे राहिले आहेत, ते पुढील वर्षामध्ये खर्च करण्यास परवानगी देण्यात आलेली आहे. त्या रकमेतून उर्वरित

शौचालयांची बांधकामे पूर्ण करण्यात येतील. शासनाने त्यासंदर्भात जी.आर. काढलेला आहे, असा खुलासा केला. समितीने याबाबत अशी विचारणा केली की, सदर कामाची पाहणी करण्यात आलेली आहे काय, त्यावर प्रधान सचिवांनी सदर कामाची पाहणी करण्यात आलेली आहे, परंतु सर्वच पर्यवेक्षक अधिकाऱ्यांनी शेरे बुकात नोंदी घेतलेल्या नाहीत, अशी माहिती दिली. त्यावर समितीने असे सूचित केले की, असे असतांना आपण त्यांच्या दौरा नोंदी मंजूर करुन त्यांना प्रवास व दैनिक भत्ता देणे कितपत योग्य आहे, तसेच संबंधित कार्यकारी अभियंता, शिक्षणाधिकारी, गट विकास अधिकारी यांनी ज्या ठिकाणी भेटी दिल्या, तेथील शेरे पुस्तकात नोंदी करणे आवश्यक आहे. तसेच कार्यवाही नोंदवही सुध्दा नोंदी करण्यात यावयास पाहिजे, असे नसेल तर संबंधितांना प्रवास व दैनिक भत्ता देणे योग्य होणार नाही. सर्व अधिकाऱ्यांनी शेरे पुस्तकात नोंदी करावयास पाहिजे. यासाठी आपण एक परिपत्रक काढावे अशा समितीने सूचना केल्या त्यावर प्रधान सचिवांनी असे नमूद केले की, जेव्हा जेव्हा विकास कामांची पाहणी करण्यात येईल तेव्हा ग्रामपंचायत शेरे पुस्तकात नोंदी घेण्यात याव्यात, अशा प्रकारचे परिपत्रक काढण्याचे मान्य केले.

## प्रकरण एक नांदेड जिल्हा परिषद (लेखा)

### १.१ ग्रामीण शौचालय कार्यक्रमांतर्गत शौचालय बांधकाम

**अभिप्राय व शिफारशी**

समितीसमोर आलेल्या उपरोक्त माहितीवरुन असे दिसून येते की, नांदेड जिल्हा परिषदेने ग्रामीण शौचालय बांधकामा अंतर्गत ग्रामीण शौचालये बांधकाम करण्यासाठी दहाव्या वित्त आयोगाचा पैसा खर्च केला, परंतु त्यासाठी शासनाची परवानगी घेतली नाही. शौचालयांच्या बांधकामांची तपासणी गट विकास अधिकारी यांच्यामार्फत करण्यात येते. दहाव्या वित्त आयोगाचा निधी प्रामुख्याने ग्रामीण स्वच्छतेसाठी ४० टक्के, प्राथमिक शाळांसाठी २१ टक्के, इमारत दुरुस्तीसाठी १४ टक्के निधी अशा प्रकारे एकूण ४० टक्के निधी ग्रामीण स्वच्छता कार्यक्रमासाठी खर्च करावयाचा आहे. त्याप्रमाणे संबंधीत अधिकाऱ्यांनी तपासणी करणे आवश्यक आहे. तपासणी अधिकाऱ्यांनी तपासणी करुन त्यानुसार शेरे पुस्तकात नोंद घेतली पाहिजे. शेरे पुस्तकात नोंद केल्याशिवाय त्यांची दौऱ्याची दैनंदिनी ग्राह्य धरता येत नाही. विभागाच्या प्रधान सचिवांनी तपासणी करणे अभिप्रेत आहे. तपासणी करताना त्यांच्या दौऱ्याच्या दैनंदिनीमध्ये नोंदी करतात. **काही अधिकारी तपासणी करताना ग्रामपंचायतीच्या शेरे पुस्तकात नोंदी करतात तर काही अधिकारी नोंदी करीत नाहीत, काही ठिकाणी साईटवर जावून पाहणी करण्यात येते. त्यानंतर ते लगेच पुढील कामासाठी तेथूनच निघून जातात. ग्रामपंचायतीच्या पुस्तकात नोंदी घ्यावात असे बंधन नाही असा खुलासा केला असला तरी सदर कामाची पाहणी करण्यामागील उद्देश काय आहे, सदर काम दर्जाप्रमाणे झालेले आहे किंवा नाही, याबाबतची कोठेतरी नोंद होणे आवश्यक आहे. शासनाने जे परिपत्रक काढलेले आहे त्याची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे. अंमलबजावणी जर झाली नसेल आणि ज्या अधिकाऱ्यांकडून परिपत्रकाचे उल्लंघन झाले असेल त्यांच्यांवर कठोर कारवाई करण्यात यावी व केलेल्या कारवाईचा अहवाल तीन महिन्यात समितीला सादर करण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

शौचालयाच्या बांधकामाची पहाणी केलेली आहे. परंतु पर्यवेक्षक अधिकाऱ्यांनी शेरे पुस्तकात नोंदी घेतलेल्या नाहीत. अधिकाऱ्यांनी नोंदी घेतल्या नसल्यामुळे ते पाहणी करण्यासाठी गेले होते हे स्पष्ट होत नाही. **अधिकारी कामाच्या पहाणीसाठी गेले असतील तर कामाचा दर्जा कशा प्रकारचा होता. या संदर्भातील नोंद शेरे पुस्तकात करावयास पाहिजे होती. संबंधीत कार्यकारी अभियंता, शिक्षणाधिकारी, गट विकास अधिकारी यांनी ज्या ठिकाणी भेटी दिल्या तेथील शेरे पुस्तकात नोंदी करणे आवश्यक आहे. तसेच कार्यवाही नोंदवहीमध्ये सुध्दा नोंदी करण्यात यावयास पाहिजे असे नसेल तर संबंधितांना प्रवास भत्ता व दैनिक भत्ता देणे योग्य नाही. तसेच सर्व अधिकाऱ्यांनी शेरे पुस्तकात नोंदी करावयास पाहिजे यासाठी विभागाने तात्काळ परिपत्रक काढावे अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे.**

# नांदेड जिल्हा परिषद (लेखा)

## १.२ ब्लिचिंग पावडर विरंजक चूर्ण खरेदीतील अनियमितता

**लेखा परिच्छेद क्रमांक - ३.१७७**

जिल्हा परिषद, नांदेड येथे सन १९९९-२००० या वर्षात ब्लिचिंग पावडर विरंजक चूर्ण खरेदीमध्ये ६,९४,४००/- रुपयांची झालेली अनियमितता, त्याबाबत लेखा परिक्षकांनी खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.

ब्लिचिंग पावडर विरंजक चूर्ण खरेदीतील अनियमितता रुपये ६,९४,४००/- या संदर्भात जिल्हा परिषद, नांदेड यांचेकडून खालीलप्रमाणे लेखी स्वरुपात माहिती प्राप्त झाली.

सन १९९९-२००० मध्ये गटस्तरावरील मागणी नुसार रु. १,९९,२००/- रक्कमेची १२ मे. टन ब्लिचिंग पावडर खरेदी करणेबाबतचा प्रस्ताव सादर करुन त्यास सभापती, पाणी पुरवठा व जलसंधारण समिती यांची दिनांक १५ जून, १९९९ रोजी प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे. आदेश क्र. १६३३/दि. १५.६.९९ अन्वये प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली व आदेश नियमीत करण्यात आले आहे. खरेदी साठा संपल्यानंतर व आवश्यकतेनुसार सन १९९९-२००० मध्ये आरोग्य विभागाच्या पत्रानुसार व निकड लक्षात घेता ३२ मे.टन ब्लिचिंग पावडर खरेदी करणेबाबत प्रस्तावित करण्यात आले होते. उक्त कालावधीत आदर्श आचार संहिता असल्यामुळे शासन राजपत्र दिनांक १३.२.१९९७ आणि पाणी पुरवठा विभागाच्या निर्णयानुसार आचार संहितेच्या काळात मान्यता घेण्याचे अधिकार मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असल्यामुळे सदर ३२ मे. टन ब्लिचिंग पावडर खरेदी करण्यासाठी प्रशासकीय मान्यता मुख्य कार्यकारी अधिकारी, जि.प., नांदेड टिप्पणी परिपत्रक क्र. २०३, दि. ९/४/१९९९ अन्वये प्रदान केली आहे. आदर्श आचार संहिता संपल्या नंतर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आचार संहितेच्या कालावधीत दिलेल्या प्रशासकीय मंजूरी संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल दि. ८ जानेवारी, १९९९ रोजी झालेल्या जल संधारण व पाणी पुरवठा समितीच्या सर्व साधारण सभेत म.जि.प.व.प.स. अधिनियम १९६१ च्या नियम १२५ अन्वये महाराष्ट्र जि.प.व.प.स. लेखा संहितेच्या तरतुदी नुसार ठराव क्र.१६५ अन्वये कार्योतर मंजूरी प्रदान करण्यात आली आहे. अधिनियमाच्या कलम (९९) अन्वये सदर खरेदीस कार्योत्तर तांत्रिक मंजूरी घेण्याची कार्यवाही चालू आहे.

सन १९९८-९९ च्या वर्षातील एकूण मागणी व सन १९९९-२००० मधील मागणी विचारात घेता विभागाने १०० मे.टन ब्लिचिंग पावडर खरेदीचा प्रस्ताव सादर केला होता त्यास जलसंधारण व पाणी पुरवठा समिती सर्वसाधारण सभा दि. ८ जानेवारी, १९९९९ अन्वये प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे. परंतु आर्थिक तरतुद उपलब्ध नसल्यामुळे तरतुदींच्या अधीन राहून खरेदी करण्यात आलेली आहे. सदर खरेदीस जलसंधारण व पाणी पुरवठा समिती सर्व साधारण सभा दि. ४ फेब्रुवारी, १९९९ च्या ठराव क्रमांक १६२ अन्वये एका वर्षासाठी मान्यता घेण्यात आली याचाच अर्थ हे दर दिनांक ३ फेब्रुवारी, २००२ पर्यंत अस्तित्वात होते. त्या अनुषंगाने सन १९९९-२००० या वर्षात दि. १३ ऑगस्ट, १९९९ रोजी संबंधीत फर्मना पत्र देवून ब्लिचिंग पावडर खरेदी करण्यात आली आहे. खरेदी करतांना स्थानिक बाजार पेठेत चौकशी करण्यात आली होती व निविदाचे दर हे बाजारातील दरापेक्षा कमी होते त्यामुळे जादा दराने खरेदी करण्यात आली नाही.

सन १९९९-२००० या आर्थिक वर्षात रु ७,००,०००/- एवढे शासन अनुदान मंजूर होते सदर योजना ५० टक्के अनुदानाची असल्यामुळे रु. ३,४४,४००/- अखर्चित रक्कम शासन निधीत भरणा करण्याबाबतची कार्यवाही चालू आहे.

सन १९९८-९९ व १९९९-२००० या वर्षामधील एकूण थकबाकी रु.४,३३,६६०/- आहे. उर्वरित वसुली तातडीने करण्यात येईल. ब्लिचिंग पावडरचा योग्य विनियोग झाल्याबाबत उप विभागाकडून विनियोग प्रमाणपत्र उपलब्ध करुन घेण्यात आले आहे. .

**मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची साक्ष :-**

समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिनांक ९ नोव्हेंबर,२००५ रोजी भेट दिली असता समितीला असे दिसून आले की, सन १९९८-९९ व १९९९-२००० मध्ये अनुक्रमे १२ व ४४ मेट्रिक टन ब्लिचींग पावडरची खरेदी करण्यात आली. याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांची समितीने साक्ष घेतली त्यावेळी ४४ मे. टन ब्लिचिंग पावडर जिल्हा परिषदेने खरेदी करुन ग्रामपंचायतींना वितरीत केलेली आहे. त्यामध्ये ५० टक्के शासनाचा आणि ५० टक्के जिल्हा

परिषदेचा हिस्सा होता, असे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांनी समितीला सांगितले. ब्लिचिंग पावडरची तीन टप्प्यात खरेदी करण्याची गरज का भासली, अशी समितीने विचारणा केली असता मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीला अशी माहिती दिली की, सन १९९९-२००० मध्ये १२ मे. टन ब्लिचिंग पावडर खरेदी करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करुन सभापती, पाणीपुरवठा व जलसंधारण समिती यांची दि. १ जून १९९९ रोजी आदेश क्र. १६४३ अन्वये प्रशासकीय मान्यता घेऊन त्याप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात आले. सदर सभा संपल्यानंतर सन १९९९-२००० मध्येच आरोग्य विभागाच्या पत्रानुसार निकड लक्षात घेऊन ३३ मे. टन खरेदी करण्याबाबत याचिका दाखल करण्यात आली.

व्यवहारामध्ये आचारसंहिता असल्यामुळे सर्वसाधारण सभेची आणि अध्यक्षांची तांत्रिक मान्यता घेता आली नाही. सन १९९९ मधील व्यवहार असताना सदर खरेदीस कार्योत्तर तांत्रिक मंजूरी दिनांक २० डिसेंबर, २००४ रोजी का घेण्यात आली, अशी समितीने विचारणा केली असता कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) यांनी असे सांगितले की सन १९९८-१९९९ पूर्वी सदर पावडर आरोग्य विभागामार्फत खरेदी करण्यात येत होती तोपर्यत मान्यता घेण्यात येत नव्हती. लेखापरीक्षणाच्या वेळी घेण्यात आलेल्या आक्षेपांची नोंद घेतल्यानंतर त्याला तांत्रिक मान्यता देण्यात आली. यासंदर्भात समितीने विचारणा केली की, लेखा आक्षेप कोणत्या तारखेला घेण्यात आले आणि सन २००४ मध्ये म्हणजे पाच वर्षानंतर मान्यता का घेण्यात आली, यावर कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) यांनी सन १९९९-२००० मध्ये लेखा आक्षेप घेण्यात आले होते असे समितीला सांगितले. त्यासाठी पाच वर्षे विलंब का झालेला आहे, हे सांगता येत नाही, असे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला सांगितले. याबाबत समितीने विचारणा केली की, सांगता येत नसेल तर त्यांना जिल्हा परिषदेमध्ये कामावर का ठेवले, लेखा आक्षेप नोंदविण्यात आल्यानंतर पाच वर्षे पर्यन्त मान्यता का घेतली नाही, तसेच कराराची मुदत केव्हा पर्यंत होती, त्यासंदर्भात कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) यांनी फेब्रुवारी, २००० पर्यंत कराराची मुदत होती, असे समितीला सांगितले. त्यावर समितीने विचारणा केली की,शासनाचा जी.आर.काय आहे, त्याबाबत मुख्य कार्यकारी अभियंता, पाणीपुरवठा यांनी शासन निर्णय-पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रा.पा.पु./१२९९/सीआर/२१९ पापु-८, दिनांक २९ मे, १९९९ अन्वये ब्लिचिंग पावडर

खरेदीवर ५० टक्के अनुदान देय ठरते,  असे समितीला सांगितले. त्यावर मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीला अशी माहिती दिली की, ब्लिचिंग पावडरची मागणी सहा महिन्याच्या

आतच केलेली आहे, त्यास फक्त तांत्रिक मान्यता राहिली होती. त्यासंदर्भात मुख्य कार्यकारी अभियंता (पाणीपुरवठा) यांनी मूळ जो दर होता त्याच दराने ऑर्डर दिलेली आहे, असे समितीला सांगितले. ब्लिचिंग पावडर खरेदी करण्याकरिता शासनाकडून प्राप्त झालेल्या अनुदानापैकी शिल्लक रक्कम रुपये २८००/- शासनाच्या खात्यावर उशिराने जमा का करण्यात आली, ब्लिचिंग पावडर हिश्श्याची ५० टक्के रक्कम पंचायत समितीकडून वसुल न होण्याची कारणे कोणती अशी विचारणा केली असता पंचायत समितीकडून थकित असलेली रक्कम वसूल करुन घेण्यात येईल असे समितीस सांगण्यात आले.

**सचिवांची साक्ष :**

समितीने नांदेड जिल्हा परिषदेने पाठविलेल्या लेखी माहितीच्या आधारे सहसचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांची दिनांक २८ जून, २००६ रोजी साक्ष घेतली. त्या वेळी समितीने विचारणा केली की, जिल्हा परिषदेने सन १९९८-९९ व सन १९९९-२००० मध्ये अनुक्रमे १२ व ४४ मेट्रीक टन ब्लिचिंग पावडर खरेदी केली होती. हे खरे आहे काय, असल्यास, सदर खरेदीस जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाची तसेच सर्वसाधारण सभेची व विषय समितीची मान्यता न घेता खरेदी केल्याचे शासनाच्या निदर्शनास आले हे खरे आहे काय, असल्यास, केव्हा व या प्रकरणी शासनाने काय कारवाई केली आहे, कारवाई केली नसल्यास, त्याची कारणे काय आहेत, याबाबत सहसचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीला अशी माहिती दिली की, त्याची थोडक्यात पार्श्वभूमी अशी आहे की, १२ मे.टन व ४४ मे.टन एवढ्या ब्लिचिंग पावडरची खरेदी जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केली होती. ३२ मे.टन ब्लिचिंग पावडरची खरेदी दि.१३ ऑगस्ट, १९९९ रोजी मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांची मान्यता घेऊन केली होती. ही खरेदी झाली त्यावेळी निवडणुकीची आचारसंहिता असल्यामुळे विषय समितीची परवानगी घेता आली नाही. आचारसंहितेच्या काळात समितीची बैठक बोलाविता येत नाही. परंतु, त्यावेळी ब्लिचिंग पावडरची निकड असल्यामुळे त्यांनी ही खरेदी केली, हाच मुद्दा लेखापरिक्षण अहवालामध्ये आला होता व लेखा परिक्षकांनी सदर खरेदीस कार्योत्तर मंजूरी घेण्याची सूचना केली होती. त्यांच्या सुचनेप्रमाणे दि.२१ ऑक्टोबर, २००४ रोजी सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवून मान्यता घेण्यात आली होती.

ब्लिचिंग पावडरची ३ टप्प्यात खरेदी करण्याची गरज का भासली, यासंबंधी सहसचिव, पाणी पुरवठा विभाग यांनी टीसीएल ३ महिन्यांपर्यंत टिकते, तसेच साठवणुकीची व्यवस्था नसल्यामुळे टप्प्याटप्प्याने खरेदी करण्यात आली असे समितीला सांगितले.

कार्योत्तर मंजूरी घेण्यास विलंब का झाला व विलंबाची कारणे काय आहेत, अशी समितीने विचारणा केली असता लेखापरीक्षण अहवालामध्ये कार्योत्तर मंजूरी घेण्याच्या सूचना देण्यात आल्या होत्या. लेखापरीक्षण अहवाल आल्यानंतर कार्योत्तर मंजूरी घेण्यात आली आहे असे सहसचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीला सांगितले. यासंबंधीत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला पुढे असे सांगितले की, लेखापरीक्षण दिनांक ५ डिसेंबर, २००० ते दिनांक ३१ डिसेंबर, २००० या कालावधीत झाले. लेखापरिक्षणाचा अहवाल दिनांक १२ मार्च, २००१ रोजी प्राप्त झाला. अहवालामध्ये तांत्रिक मान्यतेबाबत आक्षेप घेण्यात आला होता. त्या आक्षेपानुसार दिनांक २० ऑक्टोबर, २००४ रोजी कार्योत्तर मंजूरी घेण्यात आली.

याबाबत समितीने अशी विचारणा केली की, सन २००१ मध्ये लेखा परिक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर सन २००४ मध्ये कार्योत्तर मंजूरी घेण्यात आली आहे. यामध्ये ३ वर्षे एवढा विलंब होण्याची कारणे काय आहेत, त्याबाबत सहसचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीला अशी माहिती दिली की, यामध्ये तांत्रिक मान्यता घेण्याची आवश्यकता नाही. कारण हे काही विकासात्मक काम नाही. रस्ते, पूल वगैरे बाबींसाठी तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक असते. टीसीएलची खरेदी जिल्हा परिषदेला दरवर्षी करावी लागते. दरवर्षी खरेदी होत असल्यामुळे तांत्रिक मान्यता घ्यावी असे अपेक्षित नाही. यासंबंधी समितीने विचारणा केली की, जर तांत्रिक मान्यता घेण्याची आवश्यकता नसेल तर लेखा परिक्षकांनी अशा प्रकारचा आक्षेप का घेतला, तसेच, कोणत्याही वस्तुची खरेदी करीत असतांना त्यासाठी मान्यता घेण्याची गरज नाही काय, पण जर अशी वस्तुस्थिती होती तर संबंधित विभागाने ती बाब लेखा परिक्षकांच्या निदर्शनास लेखा परीक्षणाच्या वेळीच का आणली नाही, याबाबत सह सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीला असे सांगितले की, वस्तुची खरेदी करताना प्रशासकीय मंजुरीची आवश्यकता आहे. तसेच या प्रकरणी ५ लाख रुपयांपेक्षा जास्त खरेदी असल्यामुळे प्रशासकीय मंजूरी घेणे आवश्यक होते. मात्र, तांत्रिक मान्यता संबंधित

विभागांचे अधिकारी देत असतात. जसे, आरोग्यविषयक काही खरेदी असेल तर संबंधित जिल्ह्याचे जिल्हा आरोग्य अधिकारी तांत्रिक मान्यता देतात.

समितीने यासंदर्भात अशी विचारणा केली की, सन १९९९-२००० मध्ये खरेदी करीत असताना ती सन १९९८-९९ च्या दरानेच केलेली आहे. दुसऱ्या वर्षी खरेदी करीत असतांना पुन्हा दरपत्रक मागविणे आवश्यक होते. त्याचप्रमाणे या खरेदीसाठी प्रशासकीय मान्यताही घेण्यात आलेली नाही. यासंबंधी मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला विदीत केले की, ब्लिचिंग पावडर एकाच दराने विकत घेतलेली आहे. एकूण ८४ मे. टन खरेदी करण्यात आलेली आहे. २५ किलोची बॅग याप्रमाणे प्रति बॅग रु. ४५०/- या दराने खरेदी केलेली आहे. या दरामध्ये फरक नाही यासंबंधी सहसचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीला असे सांगितले की, दिनांक ४ फेब्रुवारी, १९९९ च्या पाणी पुरवठा समितीच्या ठराव क्रमांक १६० प्रमाणे दर निश्चित करण्यात आले होते. या निविदेचा दर आणि वैधता दिनांक ३ फेब्रुवारी, २००० पर्यंत होती. समितीमध्ये दर निश्चित करण्यात आलेले असल्यामुळे या संदर्भात कोणताही आक्षेप नव्हता. ब्लिचींग पावडरची १२ मे. टन, ३२ मे. टन, ४३ मे. टन अशी ३ टप्प्यात करण्यात आलेली आहे. रु. १६,६००/-प्रति मे. टन असा दर असल्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला सांगितले. लेखा परीक्षकांनी समितीला असे सांगितले की, लेखा परीक्षणाच्या वेळी किंवा नंतर विभागाकडून कोणताही खुलासा आलेला नाही तसेच जर आवश्यकता नव्हती तर विभागाने कार्योत्तर मंजूरी घेण्याची आवश्यकता नव्हती. लेखा परीक्षण अहवालामध्ये हा विषय सर्वसाधारण सभेपुढे ठेवण्याबाबतच्या सूचना असल्यामुळे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्वसाधारण सभेची मान्यता घेतली असल्याचे सहसचिवांनी समितीला सांगितले, ४ वर्षाच्या कालावधीनंतर सर्वसाधारण सभेत ठेवण्याची आवश्यकता काय होती ? या संबंधी सहसचिवांनी समितीला सांगितले की, खरे पाहता तशी आवश्यकता नव्हती, तरी देखील सेफ साईड म्हणून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सर्वसाधारण सभेपुढे ठेवले असावे.

**अभिप्राय व शिफारशी**

समितीने नांदेड जिल्हा परिषदेस भेट दिली, त्यावेळी समितीस प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे समितीला जिल्हा परिषदेने खरेदी केलेल्या ब्लिचिंग पावडरच्या प्रस्तावास जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाची तसेच सर्वसाधारण सभेची व विशेष समितीची मान्यता घेण्यात आली नसल्याचे समितीला आढळून आले. त्यासंदर्भात विभागीय सचिवांची समितीने साक्ष घेतली त्यावेळी सहसचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस अशी माहिती दिली की, १२ मे. टन व ४४ मे. टन एवढ्या ब्लिचिंग पावडरची खरेदी जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभेची मान्यता घेवून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केली होती. ही खरेदी झ ाली त्यावेळी निवडणुकीची आचारसंहिता असल्यामुळे समितीची बैठक बोलविता आली नाही. त्यामुळे विशेष समितीची परवानगी घेता आली नाही. मात्र मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांच्या सूचनेप्रमाणे दिनांक २१ ऑक्टोंबर, २००४ रोजी सदर प्रस्ताव सर्वसाधारण सभेपुढे ठेवून मान्यता घेण्यात आली आहे.

लेखा परिक्षणाच्या अहवालामध्ये तांत्रिक मान्यतेबाबतचा आक्षेप घेण्यात आला होता. या आक्षेपानुसार दिनांक २० ऑक्टोंबर, २००४ रोजी कार्योत्तर मंजुरी घेण्यात आली आहे. तांत्रिक मान्यता का घेण्यात आली नाही यासंबंधी सह सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांनी समितीस अशी माहिती दिली की, या प्रकरणामध्ये तांत्रिक मान्यता घेण्याची आवश्यकता नाही. कारण हे काही विकासात्मक काम नाही. रस्ते, पुल वगैरे बाबीसाठी तांत्रिक मान्यता घेणे आवश्यक असते टीसीएलची खरेदी जिल्हापरिषदेला दरवर्षी करावी लागते. दरवर्षी खरेदी होत असल्यामुळे तांत्रिक मान्यता घ्यावी असे अपेक्षित नाही. यावरुन असे दिसून येते की, **ब्लिचिंग पावडर खरेदीच्या संदर्भातील नियमानुसार सर्व बाबींची पूर्तता जिल्हा परिषदेने केलेली आहे. मात्र लेखा परिक्षणाच्यावेळी ही बाब लेखा परिक्षकांच्या निदर्शनास आणली गेली नसल्याचे दिसून येते. तेव्हा यापुढे अशा प्रकारचे प्रस्ताव लेखा परिक्षकांच्या निदर्शनास लेखा परिक्षणांच्यावेळी आणावेत अशी समितीची शिफारस आहे.**

## जिल्हा परिषद नांदेड (लेखा)

**१.३ औषधी खरेदीबाबत**

**लेखा परिच्छेद क्र. ३.२४९**

औषधी खरेदी बाबत जिल्हा परिषद, नांदेड सन १९९९-२००० लेखा परिच्छेद क्रमांक ३.२४९ याबाबत लेखा परिक्षकांचा खालीलप्रमाणे अभिप्राय आहे.

विविध प्रकारच्या औषधी खरेदीवर दिनांक ३१ मार्च, २००२ रोजी रक्कम रु. १७,०७,६९५/- इतका खर्च केलेला आहे.

याप्रकरणी जिल्हा परिषदेकडून लेखी माहितीद्वारे पुढील खुलासा करण्यात आला.

१. मा. आयुक्त, पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी विविध पुरवठा धारकाचे औषधाची मागणी नोंदविल्यानुसार, औषधे बऱ्याच तालुक्यांना दिनांक ३१ मार्च, २००० पूर्वीच प्राप्त झाली आहेत. कांही तालुक्यास औषधी फुटलेल्या स्वरुपात/कमी पुरवठा/खराब पुरवठा झालेला असल्यास सदरील औषधी बदलून घेणेसाठी त्याच वित्तीय वर्षात प्रत्यक्षात उपलब्ध झाल्याची खात्री प्रत्येक मासिक समन्वय सभेत आढावा घेऊन तद्नंतरच संबंधित पुरवठा धारकाची रक्कमेची अदायगी करण्यात आलेली आहे.

२. तालुका पातळीवरील पशुवैद्यकीय संस्था हया ग्रामीण भागात कार्यरत असतात व त्यांना मासिक सभेचा समन्वय साधून व औषधी पूर्ण स्वरुपात प्राप्त झाल्याची खात्री करुनच एकाच दिवशी संबंधितांना ठरवून दिलेल्या दिवशी औषधाचा पुरवठा करण्यात येतो, जेणेकरुन संबंधित संस्था प्रमुखांना औषधी नेणे सोयीचे होते.

३. पशुवैद्यकीय संस्थांना पुरवठा करण्यात आलेली विविध प्रकारची औषधी विविध मोसमात जनावरामध्ये विविध प्रकारच्या होणाऱ्या रोगावर उपचार करणेसाठी त्या औषधाचा विनियोग करण्यात येतो. त्यामुळे कांही संस्थांची औषधी शिल्लक राहणे अपेक्षित आहे. जनावरांमध्ये उद्भवणारे आजार हे नैसर्गिक हवामान, स्थानिक

वातावरण, पशुपालकाची निगा या बाबीवर अवलंबून असतात. तेव्हा सदरील मुद्दा वगळण्यात यावा ही विनंती.

**मुख्य कार्यकारी अधिकारी यांची साक्ष :-**

उपरोक्त परिच्छेदाबाबत जिल्हा परिषद नांदेड यांच्याकडून प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या अनुषंगाने अधिक माहिती जाणून घेण्यासाठी समितीने मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद, नांदेड यांची दिनांक ९ नोव्हेंबर, २००५ रोजी साक्ष घेतली यावेळी समितीने विचारणा केली की, सर्व औषधे ३१ मार्चपूर्वीच प्राप्त झाल्याचे अभिलेख लेखापरीक्षणाचे वेळी का सादर करण्यात आले नाहीत, शिल्लक राहिलेल्या औषधांमध्ये कालबाह्य औषधे समाविष्ट होती काय, यासंबंधी जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी समितीला असे विदीत केले की, ३१ मार्चपूर्वीच ही औषधे प्राप्त झाली मात्र वाटप विलंबाने झालेले आहे. दिनांक १६ मार्च, २००० रोजी आम्ही ऑर्डर दिली आणि मालाचा पुरवठा दिनांक २७ ते २९ च्या दरम्यान पंचायत समितीच्या स्तरावर झालेला आहे. त्यानंतर ३१ मार्चला हा पुरवठा करण्यात आला आहे. या पुरवठयाबाबतचे ११ फेब्रुवारी, २००० रोजी शासनाने आर.सी. केले होते. याबाबत समितीने विचारणा केली की, जूनची मागणी असतांना औषधांना एवढा विलंब का झालेला आहे, याबाबत मुख्य लेखा व वित्त अधिकारी यांनी समितीला विदीत केले की, संचालक, पशुसंवर्धन यांनी तशी परवानगी दिली नव्हती. या संदर्भात जिल्हा पशुसंवर्धन अधिकाऱ्यांनी समितीला असे सांगितले की, महोदय आपण वर्षातून एकदाच ही खरेदी करतो आणि पूर्ण वर्षभर ती चालवित असतो. यासंबंधी समितीने अशी विचारणा केली की, दिनांक ४ मे, २००० ते ६ मे २००० या काळात निधी मिळाला नसतांना दिनांक ३१ मार्च, २००० रोजी बिलाचे प्रदान का करण्यात आले, याचा खुलासा होणे आवश्यक आहे. हे ऑडिट ऑब्जेक्शन का निघाले आहे, यासंबंधी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी समितीला असे सांगितले की, या कामाचे आर.सी. नव्हते. ते दि. ११ फेब्रुवारी, २००० रोजी झाले आणि दि. २८ फेब्रुवारी, २००० च्या सर्वसाधारण सभेमध्ये मान्यता घेतली त्यानंतर प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. याबाबत

समितीने विचारणा केली की, सन १९९९-२००० या आर्थिक वर्षाचे अनुदान निर्धारण कधी झाले व अखर्चित रक्कम कधी समायोजित करण्यात आली, यांसबंधी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी यांनी विदित केले की, अनुदान निर्धारण दिनांक ३ जून, २००४ रोजी झालेले आहे व ते मान्य केले आहे. यावर समितीने अशी विचारणा केली की, चार वर्ष आपण आपल्याकडे हा पैसा का ठेवला, अशा प्रकारे ज्या योजनेचा पैसा त्याच योजनेवर खर्च झाला नाही तर शासनाची परवानगी मागून इतर ठिकाणी खर्च करावा, अन्यथा शासनाला तो परत करावा लागतो. या नियमाचे आपण पालन केलेले नाही. म्हणून यासंबंधी जे लेखा शिषर्क असतील, त्यांची एकत्रित रक्कम किती आली आणि त्याच वर्षी किती पैसा वापरला, यासंबंधीची माहिती समितीला देण्यात यावी अशी समितीने सूचना केली.

**सचिवांची साक्ष :-**

नांदेड जिल्हा परिषदेमध्ये विविध प्रकारच्या औषधाची खरेदी केल्याप्रकरणी दिनांक २८ जून, २००६ रोजी सचिव व आयुक्त, पशुसंवर्धन यांची समितीने एकत्रित साक्ष घेतली. साक्षीच्या वेळी समितीने अशी विचारणा केली की, जिल्हा परिषदेकडील पशुसंवर्धन विभागाला आवश्यक असलेली औषधे खरेदी करण्यासाठी दि. १६ मार्च, २००० रोजी ऑर्डर दिली असताना मालाचा पुरवठा करण्यास संचालक, पशुसंवर्धन यांनी खरेदीसाठी परवानगी केव्हा दिली होती, तसेच परवानगी विलंबाने देण्याची कारणे काय आहेत, त्यासंबधी विभागाने लेखी माहितीच्या संदर्भात असे कळविले आहे की, पशुसंवर्धन विभागाला औषधी खरेदी करीता मा. प्रादेशिक पशुसंवर्धन सह संचालक यांनी दिनांक १४ मार्च, २००० रोजी खरेदीस परवानगी (तांत्रिक मान्यता) दिली. तथापि खातेचा भावबंद दरकरार दिनांक १४ मार्च, २००० रोजी झाल्यानंतर सक्षम मान्यता घेऊन दिनांक १६ मार्च, २००० रोजी खरेदी आदेश देण्यात आले. त्यामुळे परवानगीस विलंब झाला नाही. यासंदर्भात सचिव, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय यांनी समितीला अशी माहिती दिली की, सन १९९९-२००० दरम्यान खातेस्तरावरुन आयुक्त कार्यालयाने दिनांक २१ ऑक्टोंबर, १९९९ रोजी औषधे खरेदी करण्यासंबधी सूचना दिल्या. नंतर तो प्रस्ताव शासनाकडे आला. दर करार निश्चित करण्याची प्रक्रिया ४ टप्प्यामध्ये झाली. निविदेची प्रक्रिया पूर्ण करुन शासनाच्या दिनांक ३१ डिसेंबर, १९९९ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने दरांच्या अंतिम मान्यतेसाठी शासनाने निर्देशित

केल्याप्रमाणे दिनांक २७ डिसेंबर, १९९९ रोजी प्रस्ताव सादर करण्यात आला .सदर प्रस्तावाबाबत शासनास १ जानेवारी, २००० रोजी पुन्हा पत्र सादर करण्यात आले. त्यानुसार दिनांक ११ फेब्रुवारी, २०००, २५ फेब्रुवारी, २०००, १० मार्च, २००० व १४ मार्च, २००० रोजी विविध औषधांचे खरेदी दर करार क्षेत्रीय स्तरावर परिपत्रित करण्यात आले.

जिल्हा परिषद आयुक्तांकडे मागणी करते. आयुक्त दर करार निश्चित करतात आणि शासनाकडून त्यास मान्यता मिळाल्यानंतर खरेदी केली जाते. यासंबंधी समितीने अशी विचारणा केली की, दर करार ठरविण्याची पध्दत काय आहे, यासंबधी आयुक्त, पशुसंवर्धन यांनी समितीला विदीत केले की, राज्य स्तरावर एकच दर करार निश्चित केले जाते. आयुक्त स्तरावर मालाची मागणी केल्यानंतर दर करार निश्चित करुन त्यास शासनाची मान्यता घेतेली जाते. आता एकत्रित दर कराराचा निर्णय घेण्यात आलेला आहे. याबाबत समितीने विचारणा केली की, या प्रकरणी मागणी जुनी होती, औषधांचा पुरवठा करण्यास विलंब लागण्याची कारणे काय आहेत, या संबधी सचिव, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय यांनी समितीला अशी माहिती दिली की, सन १९९९ पूर्वी दर करार ठरविण्याच्या बाबतीत विभागीय सहसंचालकांकडून तांत्रिक मान्यता घ्यावी लागत होती. तांत्रिक मान्यतेमुळे विलंब झालेला नाही. दर कराराच्या बाबतीत शासन स्तरावरुन आयुक्त कार्यालयाला जुलै महिन्यामध्ये आदेश प्राप्त झाले आणि त्यानुसार निविदा काढण्याची कार्यवाही सुरु झाली.

निधी उपलब्ध असताना औषधे पुरविण्याबाबत विलंब का झाला अशी समितीने विचारणा केली असता आयुक्त, पशुसंवर्धन यांनी समितीला विदित केले की, सुरवातीला निधी मिळाला. परंतु नंतर रेट कॉन्ट्रॅक्सच्या बाबतीत शासनाचे लेखी आदेश मिळण्याकरीता जुलै महिन्यापर्यन्त थांबावे लागले.

शासनस्तरावरुन आदेश प्राप्त झाल्यानंतर औषधांचा पुरवठा झालेला आहे. याबाबत सचिव, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय यांनी समितीला असे सांगितले की, एकत्रित दर करार ठरविण्याच्या पध्दतीमुळे आणि दरम्यानच्या काळात आचारसंहिता लागू झाल्यामुळे दर करार निश्चित करता आले नाही. यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला असे विदित केले की, मागणी नोंदविल्यानंतर औषधे मिळतात. परंतु याप्रकरणी औषधे मिळण्यास विलंब झालेला आहे. याबाबत समितीने अशी विचारणा केली की, औषधांचा पुरवठा

करण्यास कोणत्या स्तरावर विलंब झालेला आहे, याबाबत सचिव, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय यांनी साक्षीचे वेळी समितीला असे सांगितले की, जिल्हा परिषद स्तरावर हा विलंब झालेला आहे. ऑर्डर दिल्यानंतर औषधे आली. औषधांचे वाटप करण्यास ६ महिन्यांचा विलंब झालेला आहे. हा विलंब का झाला याची चौकशी करुन जबाबदारी निश्चित केली जाईल.

यासंदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी समितीला असे विदित केले की, दिनांक २१ मार्च पर्यन्त औषधे प्राप्त झाली. औषधे तालुका स्तरावर पाठविण्यास विलंब झालेला आहे. त्यासंबंधी सचिव, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्यव्यवसाय यांनी समितीला असे सांगितले की, जिल्हा परिषद स्तरावर औषधे पडून राहिली. तालुका स्तरावर औषधांचे वाटप झालेले नाही व याबाबत जबाबदारी निश्चित केली जाईल.

औषधे कालबाहय झालेली होती काय, अशी समितीने विचारणा केली असता औषधांची तपासणी करण्यात येईल असे औषधांच्या बिलांवर उत्पादन आणि मुदत संपण्याची तारीख असते असे सचिव, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय व मत्स्य व्यवसाय यांनी समितीला सांगितले.

**अभिप्राय व शिफारशी :-**

जिल्हा परिषद नांदेड, यांनी दि. ३१ मार्च, २००२ रोजी विविध प्रकारच्या औषधांच्या खरेदीवर रक्कम रु. १७,०७,६९५/- इतका खर्च केलेला आहे. सदरहू औषधे दिनांक ३१ मार्च, २००२ पूर्वीच बऱ्याच तालुक्यांना प्राप्त झाली होती. परंतु औषधांचे वितरण करण्यामध्ये विलंब झाल्याचे समितीला आढळून आले आहे. सदरहू औषधांची निवियदा प्रक्रिया ४ टप्प्यामध्ये करण्यात आलेली आहे. त्यानुसार दिनांक ११ फेब्रुवारी, २०००, २५ फेब्रुवारी, २०००, १० मार्च, २००० व १४ मार्च, २००० रोजी विविध औषधांचे खरेदी दर करार क्षेत्रीय स्तरावर करण्यात आले. यासंबंधी राज्य स्तरावर एकच दर करार निश्चित केला जातो व आयुक्त स्तरावर मालाची मागणी केल्यानंतर दर करार निश्चित करुन त्याला शासनाची मान्यता घेतली जाते आता यासंबंधी एकत्रित दर कराराचा निर्णय घेण्यात आला आहे. औषधांचा पुरवठा करण्यास जिल्हा परिषद स्तरावर विलंब झाल्याचे समितीला आढळून आले. ऑर्डर दिल्यानंतर औषधे प्राप्त झाली, मात्र औषधांचे वाटप करण्यास ६ महिन्याचा विलंब झालेला आहे. सदरहू औषधे

तालुका स्तरावर पाठविण्यासाठी विलंब झाल्याने तालुका स्तरावर औषधांचे वाटप झालेले नाही आणि ही औषधे जिल्हा परिषद स्तरावर पडून राहिली.

**औषधे ही जिवनावश्यक व तातडीच्या गरजेची बाब असतांना अधिकारी कर्मचाऱ्यांच्या हलगर्जीपणामुळे सदरहू औषधे जिल्हा परिषद स्तरावरच पडून राहिली आणि तालुका स्तरावर**

**औषधांचे वितरण करण्यास ६ महिन्याचा विलंब झाला. त्यामुळे कांही औषधे खराब होण्याची देखील शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे ही बाब गंभीर स्वरुपाची आहे असे समितीला वाटते. तेव्हा याप्रकरणी संबंधित असलेल्या अधिकाऱ्यांची चौकशी करुन त्यांच्यावर जबाबदारी निश्चित करुन अशा कर्मचाऱ्यांवर / अधिकाऱ्यांवर दंडात्मक स्वरुपाची विनाविलंब कारवाई करण्यात यावी व त्यासंबंधीचा अहवाल समितीला ३ महिन्याच्या आत पाठविण्यात यावा अशी समितीची शिफारस आहे.**

# प्रकरण दोन

## नांदेड जिल्हा परिषद (प्रशासन)

### २.१ जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळांमध्ये शिक्षकांची पदे रिक्त असल्याबाबत

नांदेड जिल्हा परिषदेच्या सन २०००-२००१ या वर्षाच्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या संदर्भात प्रश्नावली क्रमांक १ बाबत दिलेल्या माहितीच्या आधारे दिनांक ११ नोव्हेंबर, २००५ रोजी जिल्हा परिषदेला दिलेल्या भेटीच्यावेळी समितीने नांदेड जिल्हयामध्ये शिक्षकांची संख्या अत्यंत कमी असल्याबाबत विचारणा केली असता, शिक्षणाधिकारी नांदेड यांनी खुलासा केला की, ४०७ शिक्षकांची पदे रिक्त असून ती भरण्याची प्रक्रिया जवळजवळ पूर्ण झालेली आहे. येत्या २१ व २२ तारखेस अंतिम मुलाखती आहेत. समितीने पुढे असे सूचित केले की, शिक्षण सेवकांच्या नेमणूका राज्यभर एकाच वेळी केल्या पाहिजेत. कारण कुठल्याही जिल्हयाचा शिक्षक नांदेड जिल्हयामध्ये येतो आणि नोकरी मिळाल्यानंतर सोईच्या ठिकाणी बदली करुन घेऊन त्या ठिकाणी जातो. तसेच समितीने पुढे असे नमूद केले की, माध्यमिक शिक्षणाची तर यापेक्षाही कठीण परिस्थिती आहे कारण विषयवार शिक्षकच या जिल्ह्यात भरले नाहीत आणि त्यासाठी जिल्हापरिषदेने वर्षाची व्यवस्था केली पाहिजे अन्यथा शिक्षक तरी पुरविले पाहिजेत अशी सूचना केली त्यावर शिक्षणाधिकारी यांनी असे सांगितले की, जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शिक्षकांची पदे भरण्याचा सरळ सेवेचा कोटा पूर्ण झाला आहे. पदोन्नती दिल्याशिवाय पर्याय नाही. प्राथमिक शिक्षकाला माध्यमिक शाळेत दिले, तरच जागा भरता येतील शासनाकडे गेल्यावर्षी तसा प्रस्ताव दिला होता.

यासंदर्भात समितीने अशी पृच्छा केली की, जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळा याठिकाणी आहेत, परंतु एकाही माध्यमिक शाळेत मुख्याध्यापक नाही हे खरे आहे काय, त्यावर शिक्षणाधिकारी यांनी असे नमूद केले की, मुख्याध्यापक वर्ग-२ ही पदे सरळ सेवेने भरली जातात. एम.ए. (इंग्रजी), बी.एस्.सी., बी.एड् झालेल्या सुशिक्षित बेकार उमेदवारातून उपरोक्त पदे भरण्यास परवानगी द्यावी अशी विनंती केली होती परंतु शासनाने त्याबाबत परवानगी दिलेली नाही.

समितीने पुढे अशीही विचारणा केली की, याच जिल्हयामध्ये जिल्हा परिषदेमार्फत माध्यमिक शाळा चालविल्या जात आहेत माध्यमिक शिक्षण सुरु करणे हे जिल्हा परिषदेचे काम

नाही. जिल्हा परिषदेमार्फत ७० माध्यमिक शाळा चालविल्या जात आहेत. तेथे विद्यार्थ्यांची संख्या भरपूर आहे काय, त्यावर शिक्षणाधिकारी यांनी संपूर्ण शाळांमध्ये सरासरी २०० ते २५० विद्यार्थी संख्या आहे असा खुलासा केला. यावर समितीने असे मत व्यक्त केले की, विद्यार्थी संख्या कमी होण्याचे एकमेव कारण म्हणजे त्या त्या विषयाचे शिक्षक नसल्यामुळे पालक आपल्या पाल्यांना दुसऱ्या शाळेत दाखल करतात. मराठवाडयात अशा ३५६ शाळा आहेत. त्यापैकी ७० शाळा नांदेड जिल्हयात आहेत, याचा विचार झाला पाहिजे. अन्यथा या शाळा शासनाने अन्य कोणत्याही संस्थेला दिल्या पाहिजेत.

**सचिवांची साक्ष**

जिल्हा परिषदेकडून भेटीच्या वेळी प्राप्त झालेल्या लेखी माहितीच्या आधारे अधिक माहितीसाठी सचिव ग्रामविकास विभाग यांची दिनांक २७ जून, २००६ रोजी साक्ष घेण्यात आली. त्यावेळी ग्रामविकास विभागाच्या सचिवांनी शिक्षकांची रिक्त पदे भरण्यासंदर्भात असा खुलासा केला की, माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे भरण्याबाबत आदेश काढण्यात आलेले आहेत. ही पदे भरण्याबाबतची कार्यवाही सगळया जिल्हा परिषदांमध्ये सुरु आहे. माध्यमिक शाळांमधील एकूण ४१ पदे रिक्त आहेत, त्यापैकी २२ पदे भरण्यात आली आहेत. १९ पदे भरण्याच्या संदर्भात जाहिरात दिलेली आहे. याबाबत समितीने अशी विचारणा केली की, समितीने दिनांक ११ नोव्हेंबर, २००५ रोजी हा प्रश्न उपस्थित केला होता आतापर्यंत त्याबाबतीत काय कारवाई करण्यात आली, त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा केला की, शासनाने ही पदे भरण्याच्या संदर्भात वेळापत्रक तयार करुन दिलेले आहे. त्याप्रमाणे ही पदे भरण्यात येत आहेत. या पदासाठी परीक्षा घेत असताना क्लॅशेस होऊ नयेत म्हणून कुठल्या आठवडयात कुठल्या ठिकाणच्या परीक्षा घ्याव्यात या संबंधीचे टारगेट ठरवून दिलेले आहे.

समितीने पुढे अशी विचारणा केली की, प्राथमिक शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे भरण्यांत आली आहेत काय, त्यावर मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी खुलासा करताना प्राथमिक शाळांमधील शिक्षकांची रिक्त पदे भरण्यात आली आहेत. आदिवासी भागात किनवट, माहूर इत्यादी ठिकाणी भेटी देण्यात आल्या. तेथील शाळा चांगल्या चालल्या असल्याचे समितीला सांगण्यात आले.

**अभिप्राय व शिफारशी**

नांदेड जिल्हयामध्ये जिल्हापरिषदेच्या माध्यमिक शाळांमधील शिक्षकाची संख्या अत्यंत कमी असल्यामुळे पालक आपल्या पाल्यांना दुसऱ्या शाळांमध्ये पाठवितात. परिणामी जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या कमी होते.

समितीने नांदेड जिल्हा परिषदेला दिनांक ११ नोव्हेंबर, २००५ रोजी भेट दिली असता मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे समवेत घेतलेल्या बैठकीच्यावेळी दिलेली माहिती, तसेच विभागीय सचिवांनी साक्षीच्या वेळी समितीला दिलेल्या माहितीवरुन असे दिसून येते की, नांदेड जिल्हा परिषदेमध्ये प्राथमिक शाळांमधील तसेच माध्यमिक शाळांमधील शिक्षकांची संख्या अत्यंत कमी असल्यामुळे पालक आपल्या पाल्यांना जिल्हा परिषदेच्या शाळांमधून काढून दुसऱ्या शाळेत पाठवितात त्यामुळे जिल्हा परिषदेच्या शाळांमधील विद्यार्थ्यांची संख्या कमी होते. याबाबत असे सुचविण्यात येते की, जिल्हा परिषदेमधील शाळांतील विद्यार्थ्यांची संख्या कमी होणार नाही, त्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. **समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, प्रत्येक जिल्हयातील शिक्षकांची भरती करताना इतर कोणत्याही जिल्हयातील शिक्षकांची नेमणूक केली जाते व नोकरी मिळाल्यानंतर असे शिक्षक आपल्या सोईच्या ठिकाणी बदली करुन घेऊन निघून जातात. त्यासाठी शिक्षण सेवकांच्या नेमणूका करताना राज्यभर एकाचवेळी अशा नेमणूका करण्यात याव्यात म्हणजे जेणेकरुन शिक्षण सेवकांची भरती केल्यानंतर त्यांच्या सोईच्या ठिकाणीच त्या त्या शिक्षकांची नेमणूक करता येईल. अशी समितीची शिफारस आहे.**

**त्याचप्रमाणे समितीच्या असेही निदर्शनास आले आहे की, जिल्हा परिषदेच्या माध्यमिक शाळेत जे विषय शिकविले जातात, त्यासाठी जिल्हयात विषयवार शिक्षकच भरले जात नाहीत. त्यामुळे ज्या शिक्षकाची ज्या विषयासाठी भरती केलेली असते, तो विषय त्यांना शिकवावा लागतो. त्याशिवाय आवश्यकतेनुसार इतरही विषय शिकविण्यासाठी त्यांना आग्रह केला जातो. त्यासाठी जिल्हा परिषदेने पर्यायी व्यवस्था करणे आवश्यक आहे. अन्यथा संबंधीत विषय शिकविणारे शिक्षक पुरविले पाहिजेत अशीही समितीची शिफारस आहे.**

**जिल्हा परिषदेच्या अनेक माध्यमिक शाळांना मुख्याध्यापक नसल्याचेही समितीला आढळून आलेले आहे. मुख्याध्यापक ही वर्ग-२ ची पदे सरळसेवेने भरली जातात. त्यासाठी एम.ए. (इंग्रजी), बी.एस्.सी., बी.एड्. अशा उमेदवारांची निवड केली जाते. त्यासाठी**

राज्यातील सुशिक्षित बेकार एम्.ए. (इंग्रजी), बी.एस्सी. बी.एड्.यासारख्या पदवीधर उमेदवारांची मुख्याध्यापक या पदावर भरती करण्यासाठी शासनाने परवानगी द्यावी जेणेकरुन जिल्हा परिषदेच्या शाळांमधील मुख्याध्यापक ही पदे रिक्त राहणार नाहीत अशी समितीची शिफारस आहे.

# परिशिष्ट

## समितीच्या बैठकींचे संक्षिप्त कार्यवृत्त

**बैठक : ९ नोव्हेंबर, २००५**
**स्थळ : यशवंतराव चव्हाण सभागृह, नांदेड,**
**वेळ : सकाळी ११.०० ते सायंकाळी ६.१५ वाजेपर्यंत**

**उपस्थिती**

१. श्री. रमेशचंद्र बंग, वि.स.स. समिती प्रमुख.

२. श्री. किसन कथोरे, वि.स.स.

३. श्री. माणिकराव जगताप, वि.स.स.

४. श्री. श्रीनिवास देशमुख - गोरठेकर, वि.स.स.

५. श्री. दिगंबर भेगडे, वि.स.स.

६. ॲड. विजय जाधव, वि.स.स.

७. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.

८. श्री. टी.पी.कांबळे, वि.स.स.

९. श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.

१०. श्री. शिवाजीराव पाटील, वि.प.स.

११. श्रीमती. कांता नलावडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री.अे.अे. शेटये, कक्ष अधिकारी

**मुख्य लेखापरिक्षक, स्थानिक निधी (लेखा)**

श्री. सी.जी. पवार, मुख्य लेखापरीक्षक

**ग्रामविकास व जलसंधारण विभाग**

श्री. व्ही.जे. बिजवे, उप सचिव

## जिल्हापरिषद, नांदेडचे पदाधिकारी व अधिकारी

१. श्री. रावसाहेब मोरे, अध्यक्ष, जि.प. नांदेड
२. श्री.बाबाराव एबंडवार, उपाध्यक्ष
३. श्री.गोविंदराव राठोड, सभापती, बांधकाम व अर्थ समिती.
४. श्री. श्रीनिवास बंडेवार, सभपती, कृषि व पशुसंवर्धन समिती
५. सौ.लक्ष्मीबाई शिवारेड्डी, सभापती, महिला व बालकल्याण समिती
६. श्री. जी.बी. मवारे, मुख्य कार्यकारी अधिकारी.
७. श्री. एन.एम. रासकर, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी
८. श्री. पी.टी.केंद्रे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी
९. श्री. एन.पी. धांडे, उप मुख्य काय्रकारी अधिकारी
१०. श्री. एन.डी. पठाण, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
११. श्री. आर.डी. कुलकर्णी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
१२. श्री. एस.आय. मुखेडकर, कार्यकारी अभियंता (बांधकाम)
१३. श्री. देशपांडे, कार्यकारी अभियंता, बांधकाम
१४. श्री. मोहम्मद जमील, कार्यकारी अभियंता, ल.पा.
१५. श्री. डी.टी. पाटील, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
१६. डॉ. हाशमी, एस.एन. जिल्हा आरोग्य अधिकारी
१७. श्री. पी.एस. डहाळे, कृषि विकास अधिकारी
१८. डॉ.सुनील खोडवे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
१९. श्री. शेंदारकर, समाजकल्याण अधिकारी
२०. श्री. गोविंद नांदेडे, शिक्षणाधिकारी
२१. सौ. एस.व्ही. पांडव, गटविकास अधिकारी, नांदेड

२२. श्री. आर.डी. पवार, ग.वि.अ. मुदखेड

२३. श्री. जी.एम. आत्राम, ग.वि.अ. अर्धापूर

२४. श्री. एस.एन. इनामदार, ग.वि.अ. उमरी.

२५. श्री. एस.डी.जोशी, ग.वि.अ. हदगांव

२६. श्री. व्ही.पी. पाटील, ग.वि.अ.हिमायतनगर

२७. श्री. पी.एच. ठवरे, ग.वि.अ. किनवट

२८. श्री. एम.एम. ढवळे, ग.वि.अ. माहूर.

२९. श्री. एस.एन. गोपाल, ग.वि.अ. मुखेड.

३०. श्री. व्ही.जी. आमले, ग.वि.अ. कंधार.

३१. डॉ. संजय तुबाकले, ग.वि.अ. लोहा.

३२. श्री. के.बी. जाधव, ग.वि.अ. बिलोली

३३. श्री. एम.व्ही. करडखेलकर, ग.वि.अ. धर्माबाद

३४. श्री. पी.आर. कुरळकर, ग.वि.अ. नायगांव.

३५. श्री. पी.व्ही. नाईक, ग.वि.अ. देगलूर

३६. श्री. यु.डी. रहाटीकर, ग.वि.अ. भोकर

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने नांदेड जिल्हापरिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांची सन १९९९-२००० च्या लेखा परिक्षा पुनर्विलोकन अहवालातील नांदेड जिल्हा परिषदेशी संबंधित असलेल्या परिच्छेदावर साक्ष घेतली.

**बैठक : ११ नोव्हेंबर, २००५**
**स्थळ : यशवंतराव चव्हाण सभागृह, नांदेड,**
**वेळ : सकाळी १०.२५ ते सायंकाळी ५.२५ वाजेपर्यंत**

**उपस्थिती**

१. श्री. रमेशचंद्र बंग, वि.स.स. समिती प्रमुख.

२. श्री. किसन कथोरे, वि.स.स.

३. श्री. माणिकराव जगताप, वि.स.स.

४. श्री. श्रीनिवास देशमुख - गोरठेकर, वि.स.स.

५. श्री. दिगंबर भेगडे, वि.स.स.

६. ॲड. विजय जाधव, वि.स.स.

७. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.

८. श्री. टी.पी.कांबळे, वि.स.स.

९. श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.

१०. श्री. शिवाजीराव पाटील, वि.प.स.

११. श्रीमती. कांता नलावडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

श्री.अे.अे. शेटये, कक्ष अधिकारी

**मुख्य लेखापरिक्षक, स्थानिक निधी (लेखा)**

श्री. सी.जी. पवार, मुख्य लेखापरीक्षक

**ग्रामविकास व जलसंधारण विभाग**

श्री. व्ही.जे. बिजवे, उप सचिव

## जिल्हापरिषद, नांदेडचे पदाधिकारी व अधिकारी

१. श्री. रावसाहेब मोरे, अध्यक्ष, जि.प. नांदेड
२. श्री.बाबाराव एबंडवार, उपाध्यक्ष
३. श्री.गोविंदराव राठोड, सभापती, बांधकाम व अर्थ समिती.
४. श्री. श्रीनिवास बंडेवार, सभपती, कृषि व पशुसंवर्धन समिती
५. सौ.लक्ष्मीबाई शिवारेड्डी, सभापती, महिला व बालकल्याण समिती
६. श्री. जी.बी. मवारे, मुख्य कार्यकारी अधिकारी.
७. श्री. एन.एम. रासकर, अति.मुख्य कार्यकारी अधिकारी
८. श्री. पी.टी.केंद्रे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी
९. श्री. एन.पी. धांडे, उप मुख्य कार्यकारी अधिकारी
१०. श्री. एन.डी. पठाण, प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
११. श्री. आर.डी. कुलकर्णी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी
१२. श्री. एस.आय. मुखेडकर, कार्यकारी अभियंता (बांधकाम)
१३. श्री. देशपांडे, कार्यकारी अभियंता, बांधकाम
१४. श्री. मोहम्मद जमील, कार्यकारी अभियंता, ल.पा.
१५. श्री. डी.टी. पाटील, कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा
१६. डॉ. हाशमी, एस.एन. जिल्हा आरोग्य अधिकारी
१७. श्री. पी.एस. डहाळे, कृषि विकास अधिकारी
१८. डॉ.सुनील खोडवे, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी
१९. श्री. शेंदारकर, समाजकल्याण अधिकारी
२०. श्री. गोविंद नांदेडे, शिक्षणाधिकारी
२१. सौ. एस.व्ही. पांडव, गटविकास अधिकारी, नांदेड

२२. श्री. आर.डी. पवार, ग.वि.अ. मुदखेड

२३. श्री. जी.एम. आत्राम, ग.वि.अ. अर्धापूर

२४. श्री. एस.एन. इनामदार, ग.वि.अ. उमरी.

२५. श्री. एस.डी.जोशी, ग.वि.अ. हदगांव

२६. श्री. व्ही.पी. पाटील, ग.वि.अ.हिमायतनगर

२७. श्री. पी.एच. ठवरे, ग.वि.अ. किनवट

२८. श्री. एम.एम. ढवळे, ग.वि.अ. माहूर.

२९. श्री. एस.एन. गोपाल, ग.वि.अ. मुखेड.

३०. श्री. व्ही.जी. आमले, ग.वि.अ. कंधार.

३१. डॉ. संजय तुबाकले, ग.वि.अ. लोहा.

३२. श्री. के.बी. जाधव, ग.वि.अ. बिलोली

३३. श्री. एम.व्ही. करडखेलकर, ग.वि.अ. धर्माबाद

३४. श्री. पी.आर. कुरळकर, ग.वि.अ. नायगांव.

३५. श्री. पी.व्ही. नाईक, ग.वि.अ. देगलूर

३६. श्री. यु.डी. रहाटीकर, ग.वि.अ. भोकर

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने नांदेड जिल्हापरिषदेचा सन २०००-२००१ च्या वार्षिक प्रशासन अहवालाच्या प्रश्नावली क्रमांक १ च्या संदर्भात मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांची साक्ष घेतली.

**बैठक : दिनांक २७ जून, २००६**
**स्थळ : विधान भवन, मुंबई**
**वेळ : दुपारी १.०० ते २.०० वाजेपर्यंत**

## उपस्थिती

१. श्री. रमेशचंद्र बंग, वि.स.स. तथा समिती प्रमुख.,
२. श्री. दिलीप बनसोड, वि.स.स.,
३. श्री. किसन कथोरे, वि.स.स.,
४. श्री. माणिकराव जगताप, वि.स.स.
५. श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.,
६. श्री. हाफिज धत्तुरे, वि.स.स.
७. श्री. सुनिल केदार, वि.स.स.
८. श्री. संजय राठोड, वि.स.स.
९. श्री. विजय वडेट्टीवार, वि.स.स.
१०. श्रीमती मनिषा निमकर, वि.स.स.
११. श्री. दिगंबर भेगडे, वि.स.स.
१२. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.
१३. श्री. टी.पी. कांबळे, वि.स.स.
१४. श्री. शिवाजीराव पाटील, वि.प.स.
१५. श्रीमती कांता नलावडे, वि.प.स.
१६. श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री. भा.ना. कांबळे, उप सचिव

**विभागीय प्रतिनिधी**

१. श्री. जयराज फाटक, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
२. श्रीमती कविता गुप्ता, सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुबंई.
३. श्री. एम.एस.मुंढे, मुख्य अभियंता (द.व प्र.) व सह सचिव, मंत्रालय, मुंबई.

४. श्री. बिजवे, उप सचिव, ग्रामविकास विभाग, मंत्रालय, मुंबई.
५. श्री. गोकूळ मवारे, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड.

**बैठक : दिनांक २८ जून, २००६**
**स्थळ : विधान भवन, मुंबई**
**वेळ : दुपारी १.०० ते २.०० वाजेपर्यंत**

## उपस्थिती

१. श्री. रमेशचंद्र बंग, वि.स.स. तथा समिती प्रमुख.,
२. श्री. दिलीप बनसोड, वि.स.स.,
३. श्री. किसन कथोरे, वि.स.स.,
४. श्री. माणिकराव जगताप, वि.स.स.
५. श्री. सुनिल केदार, वि.स.स.
६. श्री. संजय राठोड, वि.स.स.
७. श्री. चंद्रशेखर बावनकुळे, वि.स.स.
८. श्री. टी.पी. कांबळे, वि.स.स.
९. श्रीमती कांता नलावडे, वि.प.स.
१०. श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**
श्री. भा. ना. कांबळे, उप सचिव

**मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी (लेखा)**
श्री.सी.जी. पवार, मुख्य लेखापरीक्षक

**विभागीय प्रतिनिधी**

१. श्री. एस.एस. हुसेन, प्रधान सचिव, महसूल व वन विभाग
२. श्री. पी.पी. श्रीवास्तव, प्रधान सचिव (गृह विशेष) गृह विभाग
३. श्री. बलदेव चंद, प्रधान सचिव (सामाजिक न्याय) सा.न्या.सां.का. व विशेश सहाय्य विभाग
४. श्री. सुमीत मल्लिक, सचिव (शालेय शिक्षण व क्रीडा विभाग

५. श्री. व्ही.बी. बोरगे, सचिव (रस्ते) सार्वजनिक बांधकाम विभाग
६. श्रीमती वंदना कृष्णा, सचिव महिला व बालविकास विभाग
७. श्री.एस.एन. हुद्दार, सचिव जलसंपदा विभाग (लाभक्षेत्र विकास)
८. श्री.मुकेश खुल्लर, सचिव (कृषि) कृषि व पदुम विभाग
९. श्री.उत्तम खोब्रागडे, सचिव (पदुम)
१०. श्री.विजय कुमार, आयुक्त, पदुम
११. श्री. अे.डी.ठाकरे, कृषि संचालक
१२. श्री. पी.बी. जाधव, सचिव व विधी सल्लागार, विधी व न्याय विभाग
१३. श्री. डी.के. शिवाजी, विकास आयुक्त (उद्योग) उद्योग संचालनालय,
१४. डॉ.प्र.प्र. डोके, संचालक, आरोग्य सेवा, सार्वजनिक आरोग्य विभाग
१५. डॉ.एम.आर. जगताप, सहाय्यक संचालक, सार्वजनिक आरोग्य विभाग
१६. श्री.संजीवकुमार, सह सचिव, पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग
१७. श्री. राजीव जलोटा, मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र आद्योगिक विकास महामंडळ
१८. श्री.सतिश गवई, सहव्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र लघु उद्योग विकास महामंडळ
१९. श्री. गो.ब. मवारे, मुख्य कार्यकारी अधिकारी
२०. श्री. अ.त्र्य. धोंडगे, का.अ. (सा.बां.)

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन १९९९-२००० च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात नांदेड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे बैठकीच्या वेळी उपस्थित झालेल्या मुद्यांवर अधिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने प्रधान सचिव, महसूल व वन विभाग, प्रधान सचिव, गृह विभाग, प्रधान सचिव, सामाजिक न्याय विभाग, सचिव, शालेय शिक्षण विभाग, सचिव (रस्ते) सार्वजनिक बांधकाम विभाग, सचिव, महिला व बालविकास विभाग, सचिव, जलसंपदा विभाग, सचिव, कृषि विभाग, सचिव (पदुम विभाग), आयुक्त, पदुम, कृषि संचालक, सचिव व विधी सलागार, विधी व न्याय विभाग, विकास आयुक्त, उद्योग संचालनालय, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा

परिषद नांदेड व मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांची साक्ष घेतली.

**बैठक : दिनांक १ ऑगस्ट, २००६**
**स्थळ : विधान भवन, मुंबई**
**वेळ : दुपारी १.०० ते २.०० वाजेपर्यंत**

## उपस्थिती

१. श्री. रमेशचंद्र बंग, वि.स.स. तथा समिती प्रमुख,

२. श्री. किसन कथोरे, वि.स.स.,

३. श्री. माणिकराव जगताप, वि.स.स.

४. श्री. संजय राठोड, वि.स.स.

५. श्रीमती मनिषा निमकर, वि.प.स.

६. श्री. शिवाजीराव पाटील, वि.प.स.

७. श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

१) श्री.भा. ना. कांबळे, उप सचिव

२) श्री.आर.आर. काठे, समिती अधिकारी

**मुख्य लेखापरीक्षक, स्थानिक निधी (लेखा)**

श्री.सी.जी. पवार, मुख्य लेखापरीक्षक

**विभागीय प्रतिनिधी**

१. श्री.जे.एम. फाटक, प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग

२. श्री.जयंत कावळे, सचिव, सहकार विभाग

**जिल्हा परिषद, नांदेड**

१) श्री.सुरेश बेदमुथा, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी.

२) श्री. आर.डी. कुलकर्णी, मुख्य लेखा व वित्त अधिकारी.

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

सन १९९९-२००० च्या लेखा परीक्षा पुनर्विलोकन अहवालाच्या संदर्भात नांदेड जिल्हा परिषदेकडून प्राप्त झालेल्या माहितीच्या आधारे बैठकीच्या वेळी उपस्थित झालेल्या मुद्यांवर अधिक माहिती मिळविण्याच्या दृष्टीने प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग, सचिव, सहकार विभाग, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड तसेच मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांची साक्ष घेतली.

**सोमवार, दिनांक ९ एप्रिल, २००७**
**स्थळ : विधान भवन, मुंबई.**

**उपस्थिती :**

२६) श्री. राजन पाटील, वि.स.स., समिती प्रमुख

२७) श्री. नाना पंचबुध्दे, वि.स.स.

२८) श्री. दिलीप बनसोड, वि.स.स.

२९) श्री. रमेशचंद्र बंग, वि.स.स.

३०) श्री. माणिक जगताप, वि.स.स.

३१) श्री. श्रीनिवास देशमुख (गोरठेकर), वि.स.स.

३२) श्री. दिलीपकुमार सानंदा, वि.स.स.

३३) ॲड. के.सी. पाडवी, वि.स.स.

३४) श्री. सुभाष बने, वि.स.स.

३५) श्री. राजेंद्र मुळक, वि.स.स.

३६) श्री. विरेंद्र जगताप, वि.स.स.

३७) श्री. सुनिल केदार, वि.स.स.

३८) श्रीमती मनिषा निमकर, वि.स.स.

३९) श्री. कैलास पाटील, वि.स.स.

४०) श्री. विश्वास नांदेकर, वि.स.स.

४१) श्री. संजय राठोड, वि.स.स.

४२) श्री. अतुल देशकर, वि.स.स.

४३) श्री. उत्तम इंगळे, वि.स.स.

४४) श्री. साहेबराव घोडे, वि.स.स.

४५) श्री. सदाशिव लोखंडे, वि.स.स.

४६) श्री. शरद रणपिसे, वि.प.स.

४७) श्री. प्रतापसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.

४८) श्री. शिवाजीराव पाटील, वि.प.स.

४९) श्री. दिवाकर रावते, वि.प.स.

५०) श्री. रामनाथ मोते, वि.प.स

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

श्री. वि.वा.देशमुख, उप सचिव
श्री.रा.रा.काठे, समिती अधिकारी
श्री.शा.पां.कांबळे,कक्ष अधिकारी
श्री. एस.बी.गायकवाड, कक्ष अधिकारी

**संक्षिप्त कार्यवृत्त :**

समितीने बैठकीत दहाव्या अहवालाच्या प्रारुपावर विचार करुन तो किरकोळ सुधारणांसह संमत केला.